
रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १८ ◆ अंक २५४
www.ramprahar.com
◆ गुरुवार, २ एप्रिल २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

घरफोडी करणारे सराईत गुन्हेगार ताब्यात/३
मिनीबसमध्ये बिघाड; सुदैवाने अनर्थ टळला/५
कोर्लईत कृत्रिम पाणीटंचाई; ग्रामस्थांचे हाल/७

## मत्स्य निर्यातीत महाराष्ट्र देशात दुसऱ्या स्थानी



**मुंबई :** महाराष्ट्राने मत्स्य निर्यात क्षेत्रात पुन्हा एकदा आपली ताकद सिद्ध करत देशात दुसरे स्थान पटकावले आहे. मत्स्य विकास मंत्री नितेश राणे यांच्या नेतृत्वाखाली राज्यातील मत्स्यव्यवसायाला मिळालेल्या चालनेमुळे ही कामगिरी शक्य झाली आहे. केंद्र सरकारच्या अहवालानुसार २०२४-२५ या आर्थिक वर्षात महाराष्ट्रातून तब्बल सात हजार ३४३ कोटी ४० लाख रुपयांच्या समुद्री उत्पादनांची निर्यात झाली आहे. गेल्या पाच वर्षांत या क्षेत्रात लक्षणीय वाढ झाली असून २०२०-२१ मधील तीन हजार ६८४ कोटींच्या तुलनेत निर्यात दुप्पट झाली आहे. निर्यातीचे परिमाणही वाढून वार्षिक २.२७ लाख मेट्रिक टनांवर पोहोचले आहे.कोकण किनारपट्टी हा या यशाचा कणा ठरला असून, विशेषतः कोळंबी आणि गोठवलेल्या मासळीचा निर्यातीत मोठा वाटा आहे.

# दिलासा! घरगुती गॅस दरात वाढ नाही

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**



नव्या आर्थिक वर्षाच्या पहिल्याच दिवशी व्यावसायिक गॅस सिलिंडरच्या दरात मोठी वाढ झाली आहे. सरकारी पेट्रोलियम कंपन्यांनी १९ किलो वजनाचा एलजीपी सिलिंडरच्या किंमतीमध्ये ३१० रूपयांची वाढ केली आहे. सलग चौथ्या महिन्यात व्यावसायिक गॅस सिलिंडरच्या दरात वाढ झाल्याने हॉटेल-रेस्टॉरंटमधील जेवण महागण्याची चिन्हे आहेत. दरम्यान, घरगुती एलपीजी सिलिंडर आणि विमान इंधनाच्या म्हणजेच एटीएफच्या (ATF) दरात कोणतीही वाढ झालेली नाही.

दरम्यान, कच्च्या तेलाच्या किमती वाढल्याच्या पार्श्वभूमीवर तेल कंपन्यांनी भारतातील व्यावसायिक एलपीजी सिलिंडरच्या दरांमध्ये वाढ करण्याचा निर्णय घेतला असल्याच सांगितलं जात आहे. त्यामुळे या दरवाढीचा परिणाम हॉटेल्स, रेस्टॉरंट्स आणि व्यावसायिक क्षेत्रावर होण्याची शक्यता आहे.

भारतातील व्यावसायिक एलपीजी सिलिंडरच्या दरांमध्ये वाढ करण्यात आली असली तरी घरगुती गॅसच्या किमतीत कोणतीही वाढ करण्यात आलेली नाही. १४.२ किलोच्या घरगुती गॅस सिलिंडरच्या किंमतीत कोणताही बदल झालेला नाही. घरगुती गॅस सिलिंडरचे दर सध्या तरी स्थिर ठेवण्यात आल्यामुळे सर्वसामान्यांना तूर्तास मोठा दिलासा मिळाला आहे.

### व्यावसायिक गॅसच्या दरात पुन्हा वाढ

महिनाभरापासून इराण-इस्रायल यांच्यामध्ये युद्ध सुरू आहे, त्यामुळे जगभरात महागाईचा भडका वाढलेला आहे. त्यातच आता १९ किलो वजनाच्या एलपीजी सिलिंडरच्या दरात पुन्हा एकदा मोठी वाढ झाली आहे. आयओसी, एचपीसीएल आणि बीपीसीएल यांसारख्या सरकारी तेल कंपन्यांनी आजपासून १९ किलोच्या व्यावसायिक सिलिंडरच्या दरात वाढ केली आहे. दिलासादायक म्हणजे, १४.२ किलोच्या घरगुती एलपीजी सिलिंडरच्या दरात कोणतीही वाढ झालेली नाही. घरगुती एलपीजी सिलिंडरच्या दरात ७ मार्च रोजी वाढ करण्यात आली होती.

सरकारने घरगुती एलपीजीच्या किमतींमध्ये कोणताही बदल केलेला नाही. १४.२ किलोच्या सिलिंडरची किंमत अखेरची ७ मार्च रोजी ६० रुपयांनी वाढवण्यात आली होती. दिल्लीमध्ये हा सिलिंडर आता ९१३ रुपयांना उपलब्ध आहे.

## विद्यालयाला लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे नाव देण्याचा प्रस्ताव महासभेत येणार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



महानगरपालिकेच्या माध्यमातून शहरातील विरुपाक्ष सभागृहाजवळ असलेल्या अंतिम भूखंड क्रमांक १२२ वर उभारण्यात येणाऱ्या विद्यालयाला दानशूर व्यक्तिमत्व माजी खासदार थोर देणगीदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे नाव देण्याचा सुधारित प्रस्ताव पुढील महासभेत सादर करण्यात येणार आहे. याबाबतच्या सूचना महापौर नितीन पाटील यांनी बुधवारी (दि.१) झालेल्या महासभेत प्रशासनाला दिल्या.

शहरातील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात झालेल्या या सभेला उपमहापौर प्रमिला पाटील, आयुक्त मंगेश चितळे, अतिरिक्त आयुक्त गणेश शेट्ये, महापालिका सचिव नानासाहेब कामठे, सभागृह नेते ॲड. प्रकाश बिनेदार, विरोधी पक्षनेते अरविंद म्हात्रे, स्थायी समिती सभापती बबन मुकादम, महिला व बाल कल्याण सभापती ममता म्हात्रे, नगरसेवक, नगरसेविका, अधिकारी उपस्थित होते.

पनवेल महानरपालिकेच्या माध्यमातून पनवेल शहरातील अंतिम भूखंड क्रमांक १२२ वर उभारण्यात येणाऱ्या विद्यालयाला लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे नाव देण्याचा नवीन प्रस्ताव सुधारणेसह पुढील महासभेत सादर करण्याच्या सूचना महापौर नितीन पाटील यांनी आज झालेल्या महासभेत प्रशासनाला दिली. त्या अनुषंगाने लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे चिरंजीव व पनवेल महानगरपालिकेचे नगरसेवक परेश ठाकूर यांच्याकडून या विद्यालयासाठी तब्बल १० कोटी रुपयाची देणगी जाहीर करण्यात आली. त्याबद्दलही महापौर नितीन पाटील यांनी आभार मानले. तर यावर विरोधी पक्षनेते अरविंद म्हात्रे यांनी लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे नाव दिले जाणार असेल तर आम्हांला आनंद आहे, असे सभागृहात स्पष्ट केले.

गोरगरिबांच्या मुलांना माफक फीमध्ये दर्जेदार शिक्षण देणारी आणि नामांकित संस्था असलेल्या जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेला भाडेपट्ट्यावर अंतिम भूखंड क्रमांक १२२ भूखंड देण्याचा प्रस्ताव महासभेच्या विषय पत्रिकेत होता. **(पान २ वर..)**

**पनवेल मनपा सर्वसाधारण सभेत विविध विषयांना मंजुरी** (वृत्त पान २ वर..)

## खरातला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी

**नाशिक :** भोंदूबाबा अशोक खरात याच्या पोलीस कोठडीची मुदत संपल्यानंतर आज म्हणजेच बुधवार १ एप्रिल रोजी त्याला न्यायालयात हजर करण्यात आले होते. न्यायालयाने दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर खरातला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. अशोक खरातला पहिल्या गुन्ह्यात न्यायलयीन कोठडी सुनावण्यात आली आहे. सध्या एसआयटीकडून अशोक खरातची चौकशी सुरु आहे. या चौकशीत अनेक धक्कादायक माहिती समोर आली. अशोक खरातविरोधात नवनव्या तक्रारी दाखल होत आहेत.

## लाडकी बहीण योजनेच्या ई-केवायसीला मुदतवाढ

**मुंबई : प्रतिनिधी**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थी महिलांसाठी एक अत्यंत आनंदाची बातमी समोर आली आहे. तांत्रिक अडचणी आणि अनेक महिलांचे e-KYC अद्याप अपूर्ण असल्याने राज्य सरकारने या प्रक्रियेला पुन्हा एकदा मुदतवाढ दिली आहे. महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे यांनी महत्त्वाची माहिती दिली आहे, जाणून घेऊया.

महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे यांनी दिलेल्या माहितीनुसार, आता महिलांना ३० एप्रिलपर्यंत त्यांचे e-KYC पूर्ण करता येणार आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा लाभ घेणाऱ्या ज्या महिलांचे आधार लिंकिंग किंवा e-KYC अद्याप प्रलंबित आहे, त्यांच्यासाठी सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. यापूर्वी ही मुदत ३१ मार्च रोजी संपत होती, मात्र ग्रामीण भागातील तांत्रिक समस्या आणि बँकांमधील गर्दी लक्षात घेता, ही मुदत आता ३० एप्रिल २०२६ पर्यंत वाढवण्यात आली आहे.

मंत्री अदिती तटकरे यांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून माहिती दिली की, कोणतीही पात्र महिला या योजनेच्या लाभापासून वंचित राहू नये, हा सरकारचा उद्देश आहे. ज्या महिलांचे अर्ज मंजूर झाले आहेत पण तांत्रिक कारणांमुळे e-KYC झालेले नाही, त्यांनी ३० एप्रिलपर्यंत ही प्रक्रिया पूर्ण करून घ्यावी.

## अटल सेतूजवळ 'शिवमुद्रा' आणि 'शिवस्मारक' उभारणार

### मंत्री आशिष शेलारांसमवेत आमदार महेश बालदींची बैठक



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मुंबईचे प्रवेशद्वार असलेल्या अटल सेतूजवळ रायगडच्या दिशेला असलेल्या एका मोठ्या खडकावर भव्य 'शिवमुद्रा' आणि 'शिवस्मारक' उभारण्याच्या हालचालींना आता वेग आला आहे. या महत्त्वपूर्ण प्रकल्पाबाबत राज्याचे मंत्री आशिष शेलार आणि उरणचे आमदार महेश बालदी यांची मंत्रालयातील दालनात बुधवारी (१ एप्रिल) विशेष बैठक झाली.

या बैठकीत संबंधित विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची उपस्थिती होती. या दोन्ही प्रकल्पांचा सविस्तर अहवाल येत्या महिनाभरात सादर करण्याचे निर्देशमंत्री आशिष शेलार यांनी दिले आहेत. शिवरायांच्या जाज्वल्य इतिहासाची साक्ष देणारे हे स्मारक पर्यटनाच्या दृष्टीनेही महत्त्वाचे ठरणार आहे. याच बैठकीत नवी मुंबई येथे जागतिक दर्जाचे अत्याधुनिक स्टेडियम उभारण्यासंदर्भातही सविस्तर आढावा घेण्यात आला. हे स्टेडियम उभारताना कनेक्टिव्हिटी, वाहतूक व्यवस्था, पार्किंग आणि पायाभूत सुविधांचा सर्वंकष विचार करूनच योग्य जागेची निवड करण्यावर मंत्री शेलार यांनी भर दिला.

नवी मुंबईतील 'स्पोर्ट्स सिटी'च्या प्रस्तावित क्षेत्रामध्ये हे स्टेडियम उभारण्याचा पर्याय सध्या विचाराधीन असून, तेथील ५० टक्के जमीन आधीच संपादित झालेली आहे. उर्वरित जमीन टप्प्याटप्प्याने संपादित करून या कामाला गती देण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या. या नियोजित स्टेडियमसाठी सुमारे ४० एकर जागा आणि इतर पूरक सुविधांसाठी अतिरिक्त ३० एकर अशा एकूण ७० एकर जागेची आवश्यकता भासणार आहे.

हा प्रकल्प दर्जेदार आणि वेळेत पूर्ण करण्यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने काम करणे गरजेचे असल्याचे सांगत, मंत्री आशिष शेलार यांनी या प्रकल्पाचा प्राथमिक अहवाल एप्रिल महिन्याच्या मध्यापर्यंत सादर करण्याचे आदेश दिले आहेत. या बैठकीस आमदार महेश बालदी यांच्यासह सिडको आणि संबंधित विभागाचे उच्चपदस्थ अधिकारी उपस्थित होते.

## राज्यात पुढील ३ ते ४ दिवस वादळी पावसाचा इशारा

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यात पुढील ३ ते ४ दिवस वादळी पावसाचा इशारा हवामान विभागाकडून देण्यात आला आहे. मुंबई, उपनगरांमध्येदेखील आज हलक्या सरींची शक्यता वर्तवण्यात आली आहे. पुणे, सातारा आणि नाशिक जिल्ह्यातील काही भागात गारपीट होण्याचा इशारा हवामान विभागाने दिला आहे.

संध्याकाळदरम्यान ४० ते ५० किमी प्रति ताशी वाऱ्यांसह पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. मध्य महाराष्ट्रातदेखील सर्वत्र वादळी वाऱ्यांसह पाऊस, काही ठिकाणी ५० ते ६० किमी वादळी वारे वाहण्याची शक्यता आहे. पुणे, सातारा आणि नाशिक जिल्ह्यातील काही भागात गारपीट होण्याचा इशारा देण्यात आला आहे. कोकणातदेखील काही जिल्ह्यात हलक्या पावसाच्या सरींचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. मुंबई, उपनगरांमध्येदेखील आज हलक्या सरींची शक्यता वर्तवण्यात आली आहे.




## राज्यातील ५४ नद्यांचे होणार पुनरूज्जीवन

**मुंबई :** राज्यातील नद्यांचे प्रदूषण कमी करण्यासाठी आणि नदी संवर्धन-पुनरूज्जीवन करण्यासाठी नियामक आणि विकासात्मक अशी दोन्ही कामे करण्यासाठी महाराष्ट्र राज्य नदी पुनरूज्जीवन प्राधिकरण स्थापन करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

राष्ट्रीय नदी संवर्धन योजनेच्या धर्तीवर राज्यात स्थापन करण्यात येणाऱ्या या प्राधिकरणाचे अध्यक्ष मुख्यमंत्री असतील, तर उपाध्यक्ष पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री असतील. वित्त मंत्री, नगरविकास मंत्री, जलसंपदा मंत्री, उद्योग मंत्री, ग्रामविकास व पंचायतीराज मंत्री सदस्य असतील पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाचे सचिव हे सदस्य-सचिव असतील.

भारतात १० प्रमुख नद्या आहेत. त्यापैकी नर्मदा, तापी, गोदावरी व कृष्णा या महाराष्ट्रात आहेत. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने २०२५ मध्ये प्रसिध्द केलेल्या अहवालानुसार देशभरात २९६ प्रदूषित नदी-पट्टे असून त्यापैकी सर्वाधिक प्रदूषित नदी-पट्टे ५४ महाराष्ट्रात आहेत.



# मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते एसटीच्या एनसीएमसी स्मार्ट कार्डचे लोकार्पण



**मुंबई, : प्रतिनिधी**


महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या वतीने विविध सामाजिक घटकांसाठी प्रवास अधिक सुलभ, पारदर्शक आणि डिजिटल करण्यात येत आहे. याच दिशेने 'RuPay On-The-Go', एनसीएमसी (NCMC) सक्षम स्मार्ट कार्ड योजनेचे लोकार्पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज मंत्रालयात करण्यात आले.यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांच्यासह सर्व मंत्री व एसटी महामंडळाचे अधिकारी उपस्थित होते.

यावेळी अमृतमहोत्सवी ज्येष्ठ नागरिक रमेश ढावरे, तसेच सवलतधारक महिला संगीता पालकर व वर्षा कांबळे यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या हस्ते एनसीएमसी स्मार्ट कार्डचे वाटप करण्यात आले.

या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांपासून ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग, महिला तसेच विविध सवलतधारक प्रवाशांना आधार क्रमांकाशी संलग्न एनसीएमसी (NCMC) स्मार्ट कार्ड वितरित करण्यात येणार आहे. या कार्डच्या माध्यमातून प्रवाशांना एसटी बस प्रवासातील सवलतींचा लाभ अधिक सुलभतेने मिळणार असून, प्रवास व्यवस्थापन अधिक डिजिटल व पारदर्शक होणार आहे.

# माथेरान मिनी ट्रेन मार्गावर ऑप्टिकल फायबर केबलच्या सुरक्षा कवचाला आग

**नेरळ : प्रतिनिधी**



नेरळ माथेरान-नेरळ या महत्त्वाच्या मिनी ट्रेन मार्गावर रेल्वेच्या ऑप्टिकल फायबर केबलवरील सुरक्षा कवचाला आग लागल्याची घटना घडली. या आगीत केबलवरील बाहेरील सुरक्षा कवच जळून आतील वायरपर्यंत आग पोहोचली होती. मात्र, ही बाब तेथून जाणाऱ्या मिनी ट्रेनमधील कर्मचारी व अधिकाऱ्यांच्या वेळीच लक्षात आल्याने त्यांनी तात्काळ सावधगिरी बाळगत परिस्थितीवर नियंत्रण मिळवले आणि मोठा अनर्थ टाळला.

माथेरान-नेरळ मिनी ट्रेन मार्गालगत जुमापट्टी वरील असलेल्या रेल्वेच्या ऑप्टिकल फायबर केबलवर अचानक आग लागली. सुरुवातीला केबलवरील सुरक्षा कवच जळू लागले आणि काही क्षणांतच आग आतील वायरपर्यंत पोहोचली. ही केबल रेल्वेच्या दळणवळण, संपर्क व्यवस्था आणि इंटरनेट सेवेसाठी अत्यंत महत्त्वाची असल्याने, या घटनेमुळे काही काळ चिंतेचे वातावरण निर्माण झाले होते.

विशेष म्हणजे, ज्या ठिकाणी ही घटना घडली त्या परिसरात झाडी आणि जंगलाचा भाग मोठ्या प्रमाणावर असल्याने आग अधिक भडकून परिसरात पसरण्याची शक्यता निर्माण झाली होती. आग वेळीच आटोक्यात आली नसती तर रेल्वेची महत्त्वाची इंटरनेट सेवा खंडित होण्यासोबतच जंगलातही आग पसरून मोठे नुकसान होऊ शकले असते.

या प्रसंगी तपासणी कर्मचारी विजय लांडगे, लोको पायलट व्ही. एम. चौथे, टीएम बी. एस. मीना तसेच ५२१०३ डाऊन सेवेवरील इतर सर्व रेल्वे कर्मचाऱ्यांनी विशेष दक्षता आणि जबाबदारी दाखवत मोठा अनर्थ टाळण्यात महत्त्वाची भूमिका बजावली.

# रोहा अष्टमी नगर परिषदेला मैला साफसफाईसाठी मिळाले अत्याधुनिक वाहन



**रोहे : प्रतिनिधी**

शासनातर्फे रोहा अष्टमी नगरपरिषदेला मैला साफसफाईसाठी अत्याधुनिक MTR Loader वाहन प्राप्त झाले आहे. त्याचे लोकार्पण नगराध्यक्ष वनश्री शेडगे यांच्या उपस्थित करण्यात आले.

यावेळी नगराध्यक्ष वनश्री शेडगे यांनी यासाठी विशेष सहकार्य दिल्याबद्दल महिला व बालविकास मंत्री आदितीताई तटकरे यांचे मनःपूर्वक आभार मानते.तसेच सतत पाठपुराव्यासाठी मुख्याधिकारी अजयकुमार एडके, स्वच्छता निरीक्षक मनोज पुलेकर आणि सिटी कोऑर्डिनेटर अमित केमसे यांचे विशेष आभार मानले.आतापर्यंत हे काम भाडेतत्त्वावर वाहन घेऊन करत होतो. आता नगरपरिषदेकडे स्वतःचे वाहन उपलब्ध झाल्यामुळे काम अधिक प्रभावीपणे करता येईल. तसेच, हे वाहन पुढे सोसायट्या व इतर ठिकाणी भाडेतत्त्वावर देण्याचीही सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

यासोबतच, लवकरच आपला FSTP (Faecal Sludge Treat-ment Plant) देखील कार्यान्वित करण्याचा मानस असल्याचे सांगत आपल्या शहराच्या स्वच्छता व्यवस्थेला अधिक सक्षम करण्यासाठी हा एक महत्त्वाचा टप्पा आहे. असे वनश्री शेडगे यांनी सांगितले.

## फिरोज मासुलदार ग्रामपंचायत कर्मचारी संघटनेच्या उपाध्यक्षपदी



**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत कर्मचारी संघटनेच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या मुंबई येथे आयोजित बैठकीत सर्वानुमते फिरोज मासुलदार यांची राज्य उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली.

या निवडीच्या प्रसंगी संघटनेचे मुख्य मार्गदर्शक तथा आमदार (कैबिनेट दर्जा) प्रसाद लाड यांच्या हस्ते मासुलदार यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. यावेळी त्यांनी त्यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा देत संघटनेच्या बळकटीकरणासाठी कार्य करण्याचा विश्वास व्यक्त केला. या बैठकीस संघटनेचे राज्याध्यक्ष विलास कुमरवार, राज्य सरचिटणीस दयानंद एरंडे, राज्य कार्याध्यक्ष जनार्दन मुळे उपस्थित होते.

# आंबेनळी घाटामध्ये वाळूवाहतूक करणारा डंपर पकडला

**पोलादपूर : प्रतिनिधी**

पोलादपूर तालुक्यातील 'आमची माती आमची माणसं' सामाजिक संघटनेकडून गेल्या आठवडयापासून तालुक्यातील नदीपात्रामध्ये मोठया प्रमाणात सुरू असलेल्या वाळू उत्खनानासंदर्भात फोटो आणि व्हिडिओ पाठवण्याचे आवाहन करण्यात येऊन संबंधिताचे नाव गोपनीय ठेवण्यासह ५१ हजार रुपयांचे रोख रकमेचे बक्षीस देण्याची ग्वाही देण्यात आली. या पार्श्वभूमीवर पोलादपूर तालुक्यातील 'आमची माती आमची माणसे' संघटनेने आंबेनळी घाटामध्ये भरगच्च वाळूवाहतूक करणारा डंपर पकडून पोलादपूर तहसील कार्यालयासमोर उभा केला.

यावेळी तहसील कार्यालयामध्ये महाड उपविभागीय अधिकारी ओमासे यांच्या उपस्थितीत तहसीलदार कपिल घोरपडे यांनी जनगणना यादी संदर्भात पोलादपूर तालुक्यातील बूथ लेवल ऑफिसरची बैठक आयोजित केली असल्याने खूप वेळ हा डंपर तहसील कार्यालयाच्या प्रांगणात उभा राहिला. या दरम्यान सामाजिक संघटनेचे तरुण कार्यकर्ते डंपर पासून काही अंतरावर मोटरसायकली घेऊन झाडाच्या सावलीमध्ये पाळत ठेवून उभे होते.

दरम्यान, वाळूने भरगच्च असलेला हा डंपर सातारा जिल्ह्यात जात असल्याचे सामाजिक संघटनेच्या कार्यकर्त्यांचे म्हणणे असून डंपर चालकाच्या म्हणण्यानुसार तो पोलादपूर तालुक्यातील पायटा गावामधील घरकुलांच्या बांधकामासाठी वाळू घेऊन चालला होता. सार्वजनिक बांधकाम विभागाने यापूर्वीच पोलादपूर तालुक्यातील नदीपात्रामधून काढण्यात आलेली वाळू ही लाल माती मिश्रित असल्याने बांधकामास उपयुक्त नसल्याचा खुलासा केला असल्याने गोरगरिबांच्या घरकुलांसाठी लाल माती मिश्रित वाळू मोफत उपलब्ध केली आहे काय, असा प्रश्न देखील या निमित्ताने उपस्थित झाला आहे.

# पनवेल महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत विविध विषयांना मंजुरी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेची महासभा १ एप्रिल रोजी महापालिकेच्या आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहामध्ये संपन्न झाली. महापौर नितीन पाटील यांच्या अध्यक्षतेखाली ही महासभा घेण्यात आली. यावेळी विविध विषयांवर चर्चा करण्यात आली.

शहरातील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात झालेल्या या सभेला उपमहापौर प्रमिला पाटील, आयुक्त मंगेश चितळे, अतिरिक्त आयुक्त गणेश शेट्ये, महापालिका सचिव नानासाहेब कामठे, सभागृह नेते ॲड. प्रकाश बिनेदार, विरोधी पक्षनेते अरविंद म्हात्रे, स्थायी समिती सभापती बबन मुकादम, महिला व बाल कल्याण सभापती ममता म्हात्रे, नगरसेवक, नगरसेविका, अधिकारी उपस्थित होते.

प्रश्नोत्तरांच्या तासांमध्ये महापालिका क्षेत्रातील चारही प्रभागातील पाणी पुरवठा समस्येवर चर्चा करण्यात आली. न्हावा शेवा पाणी योजना, अतिरिक्त टँकर मागणी, याबाबत आयुक्त मंगेश चितळे यांनी यावेळी माहिती दिली. तसेच याबाबत चर्चा करण्यासाठी विशेष बैठक घेण्याविषयी महापौरांनी निर्देश दिले.

वैद्यकीय अधिकारी शरद वसंतराव पाटील, गट-अ, यांच्या नियुक्तीस मा. सर्वसाधारण सभेची मान्यता मिळण्याचा विषय यावेळी मंजूर करण्यात आला. पनवेल महानगरपालिकेच्या दोन डायलॅसीस युनिटमध्ये उपचार घेणाऱ्या रुग्णांसाठी वापरण्यात येणाऱ्या मेडिकल गॅस सिलेंडरचे कंत्राटी तत्वावर मेडिकल गॅस रिफलिंग करून घेणेकरिता एजन्सीची नेमणुक करण्याकरिता निविदा प्रक्रिया राबविणे व त्याकरिता येणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबचा विषयांवर चर्चा करून विषय मंजूर करण्यात आला.




पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील गरोदर मातांना व बालकांना जननी शिशु सुरक्षा कार्यक्रमांतर्गत मोफत रक्त पुरवठा व रक्त संक्रमण करणेस व खाजगी, स्वंयसेवी, शासकीय व अशासकीय, धर्मादाय संस्थेच्या रक्तपेढ्यामधुन रक्त पुरवठा करणेकामी एक्सप्रेशन ऑफ इंटरेस्ट (EOI) मागविणेस मान्यता मिळणे बाबतच्या विषयावर यावेळी सविस्तर चर्चा करण्यात आली व विषय मंजूर करण्यात आला.

पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती ड मधील विविध ठिकाणी असलेल्या पनवेल महानगरपालिका मालकीच्या सर्व सार्वजनिक शौचालयांची आवश्यकतेनुसार दोन वर्षासाठी दुरुस्ती व नुतनीकरण करणे या कामाच्या प्रस्तावास प्रशासकीय व आर्थिक मान्यता मिळणे बाबतच्या विषय मंजूर करण्यात आला.

पनवेल महानगरपालिका क्षेत्रात आपत्कालीन परिस्थितीत व पावसाळ्यापूर्वी नाले साफसफाई करण्याच्या विषयावर चर्चा करण्यात आली. व एक वर्षासाठी या विषयास मंजूरी देण्यात आली. पनवेल महानगरपालिका मालकीचे अं.भु.क्र.१२२ प्रायमरी स्कूल व प्ले ग्राऊंड आरक्षित भुखंड जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था, पनवेल या संस्थेस ३० वर्षे कालावधीकरीता लिज भाडेतत्वावर उपलब्ध करुन देणेबाबतचा विषय स्थगित करून पुर्न मान्यतेसाठी सादर करण्याबाबत निर्देश देण्यात आले.

या सर्वसाधारण सभांमध्ये विषय पत्रिकेवरील मुद्द्यांना उत्तर देताना आयुक्त मंगेश चितळे यांनी सविस्तरपणे व समर्पकपणे प्रशासनामार्फत केलेल्या कामकाजाची माहिती दिली. एकूणच प्रशासन पूर्णतः पारदर्शक असल्याचे त्यांनी सांगितले.

पनवेल महानगर पालिकेमार्फत प्रशासक कालावधीत केलेल्या विविध उपक्रमांची सविस्तर माहिती स्वतंत्र पेनड्राईव्हमध्ये सर्व सन्माननीय नगरसेवकांना देण्यात आली आहे. कदाचित राज्यातील हा पहिला प्रयोग असावा.

महानगरपालिकेत प्रशासक कार्यकाल सुरू झाल्यापासून ते प्रशासक कार्यकाल संपेपर्यंत जे काही निर्णय घेतले, उपक्रम राबविले त्याची संपूर्ण माहिती सर्व नगरसेवकांना देण्यात आली आहे.पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रातील नागरिकांच्या सर्वांगीण सुविधेसाठी प्रशासन सातत्याने कार्यरत आहे.

### स्थायी समिती सदस्यपदी परेश ठाकूर यांची नियुक्ती

कामकाज पत्रिकेनुसार सदस्य प्रवीण पाटील यांनी स्थायी समिती सदस्य पदाचा राजीनामा दिल्यामुळे रिक्त झालेल्या स्थायी समिती सदस्यपदी माजी सभागृह नेते व नगरसेवक परेश ठाकूर यांची नियुक्ती करण्याचा विषय मंजूर करण्यात आला.

### अभिनंदनाचा प्रस्ताव

मुंबई येथे १५० दिवसांच्या प्रशासकीय सुधारणा कार्यक्रमांतर्गत पनवेल महानगरपालिकेने उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल सन्मानित करण्यात आल्याबद्दल आजच्या महासभेत महापालिका सदस्यांनी आयुक्त मंगेश चितळे यांचा अभिनंदनाचा प्रस्ताव मांडण्यात आला.

पान १ वरुन

## विद्यालयाला लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे नाव देण्याचा प्रस्ताव महासभेत येणार

मात्र नेहमीच अविचारी बुद्धीने चालणाऱ्या विरोधी पक्ष अर्थात शेकाप आणि शिवसेना उबाठा गटाने या प्रस्तावाला विरोध केला. त्यामुळे सभागृह नेते प्रकाश बिनेदार यांनी सडेतोड भूमिका मांडत विरोधकांच्या विरोधाभास भूमिकेचा समाचार घेतला. लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी कधीही शिक्षणात राजकारण आणले नाही.

याची त्यांनी सभागृहाला आठवण करून दिली. जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था १९९२ पासून कार्यरत, अधिकृत आणि नोंदणीकृत संस्था आहे. नियमानुसार चालणारी हि संस्था आहे, असे सांगतानाच अनधिकृत शाळांची यादी शासनाने जाहीर केली आहे यामध्ये कुणाकुणाची नावे आहेत हे तुम्हांला माहित आहे असे म्हणत माजी आमदार बाळाराम पाटील यांचे नाव न घेत त्यांनी विरोधी पक्षाला चिमटा आणला.

ॲड. बिनेदार यांनी सभागृहाला पुढे सांगितले की, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था पनवेलची आणि चांगल्या प्रकारे शिक्षण देत आहे, त्यामुळे या प्रस्तावाला मान्यता देण्याऐवजी विरोधकांनी विरोध दर्शविला त्यामुळे सभागृह नेते प्रकाश बिनेदार यांनी विरोधकांचा चांगलाच समाचार घेतला. आशिया खंडातील सर्वात मोठी शिक्षण संस्था असलेल्या रयत शिक्षण संस्थेमध्ये लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी कमवा आणि शिका या तत्वावर शिक्षण घेतले. त्यांनी केलेले कष्ट आणि कर्मवीर भाऊराव पाटील यांचा आदर्श घेऊन त्यांनी शिक्षण क्षेत्राची सुरुवात केली. संस्थेचे चेअरमन शरद पवार यांनी लोकनेते रामशेठ ठाकूर यांना रयतचे एटीएम म्हणून संबोधिले आहे. स्वर्गीय अजितदादा पवार यांनी सुद्धा यांनी सुद्धा मला बेरीज करता येणार नाही एवढी देणगी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी दिल्याचे सांगत जाहीरपणे त्यांचे कौतुक केले आहे. रयतने लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या नावाने महाराष्ट्रात अनेक शाळा, महाविद्यालये उभारली आहेत.

जेबीएसपीच्या अनेक शाळा नॅकच्या ए प्लस प्लस दर्जाने मानांकीत आहेत. असे असतानाही विरोधीपक्षाकडून चांगल्या कामाला विरोध केला जात असेल तर तो कदापिही योग्य नाही. आमचे ५९ नगरसेवक आहेत आणि विरोधी पक्ष अल्पमतात आहे. विरोधकांकडून विरोध होत असेल तर तो भूखंड जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेला नको असे स्पष्टपणे ॲड. प्रकाश बिनेदार यांनी सभागृहात मांडले. या भूखंडावर पनवेल महापालिकेने शाळा उभारावी आणि त्या शाळेला लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे नाव देण्यात यावे, असा प्रस्ताव त्यांनी मांडत या शाळेच्या नगरसेवक परेश ठाकूर यांच्याकडून १० कोटी रुपयांची देणगी दिली जाईल, असेही ॲड. प्रकाश बिनेदार यांनी सभागृहात जाहीर केले. त्यानुसार पुढील महासभेत नवीन प्रस्ताव सादर करण्याची सूचना महापौर नितीन पाटील यांनी केली. दरम्यान, नगरसेवक ॲड. मनोज भुजबळ यांनी म्हंटले की, लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शिक्षणासाठी आजपर्यंत दीडशे कोटी रुपयेहून अधिक देणगी दिली आहे. जेबीएसपी संस्थेत डोनेशन घेतले जात नाही माफक फीमध्ये शिक्षण दिले जाते तर पिल्लेज, डीएव्ही, महात्मा स्कुल अशा बाहेरून आलेल्या संस्था अवाजवी फी आणि डोनेशन घेऊन शिक्षण देत आहेत असे उल्लेखित करून एकप्रकारे विरोधी पक्षाला बाहेरच्या आणि गडगंज फी आकारणाऱ्या संस्थाचा पुळका असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

नगरसेवक प्रथमेश सोमण यांनी हि संस्था भूमिपुत्रांची आणि पनवेलची असल्याचे नमूद केले. जेबीएसपी संस्था चांगली शिक्षण संस्था असून त्यांनी विद्यार्थी घडवले आहेत असे नगरसेवक प्रकाश म्हात्रे व हरेश केणी यांनी म्हटले. तर महाविकास आघाडीतुन स्वतःचा गट निर्माण करणाऱ्या नगरसेविका लीना गरड यांच्याकडून वारंवार सभागृहाच्या कामकाजात व्यत्यय आणत सभागृहातील बेशिस्तपणा प्रत्यय सभागृहात अधोरेखित झाला होता. सवंग प्रसिद्धीसाठी आटापिटा न करता शिस्तीने सभागृहाचे काम चालावे, अशी सूचना यावेळी त्यांना महापौर यांनी केली.

## पेण येथे व.पु.काळे जयंती उत्साहात साजरी

**पेण : प्रतिनिधी**

मराठी साहित्यातील सोनेरी पान,अनेक मनांवर अनेक वर्ष राज्य करणारे बहुआयामी जेष्ठ साहित्यिक, कथाकार व.पु.काळे यांच्या जयंतीचे औचित्य साधून मराठी साहित्य मंडळ,पेण आणि महात्मा गांधी वाचनालय पेण यांच्या संयुक्त विद्यमाने 'व.पु.उलगडताना' हा व.पुं.च्या आठवणी सांगणारा मुलाखतपर कार्यक्रम महात्मागांधी वाचनालयात उत्साहात पार पडला.

स्वाती काळे चांदोरकर (जेष्ठ लेखिका,कादंबरीकार,व.पु.कन्या) यांनी व.पुं.च्या विविध पैलूंचे दर्शन घडविले. कार्यक्रमाची सुरवात मराठी साहित्य मंडळ, पेण सचिव वैभव धनावडे यांनी प्रास्ताविक सादर करून केली.

एक दर्जेदार कार्यक्रम पेणकरांना ऐकायला मिळाला.व.पु आणि त्यांच्या साहित्यिक प्रवासाबद्दल दस्तुरखुद्द त्यांच्या कन्येकडून ऐकताना विलक्षण आनंद लाभला, असे मत उपस्थित पेणकरांनी व्यक्त केले

# रायगड जिल्ह्यातील खरीवली, चांभार्ली ग्रामपंचायतींना पुरस्कार

### खरीवली ग्रामपंचायतीस 'जलसमृद्ध गाव' या थीममध्ये देशात प्रथम

**अलिबाग, चौक : प्रतिनिधी**

भारत सरकारच्या पंचायतराज मंत्रालयामार्फत दिला जाणारा प्रतिष्ठित असा दीनदयाळ उपाध्याय पंचायत सतत विकास पुरस्कार रायगड जिल्ह्यातील खालापूर तालुक्यातील खारिवली, चांभार्ली या दोन ग्रामपंचायतींना जाहीर झाला आहे.

दीनदयाळ उपाध्याय पंचायत सतत विकास पुरस्कार हा स्थानिक स्वराज्य संस्थांना ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद शाश्वत विकास उद्दिष्टे साध्य करण्यासाठी त्यांच्या उत्कृष्ट कार्यासाठी दिला जाणारा प्रतिष्ठित राष्ट्रीय पुरस्कार आहे. ग्रामपंचायतींना अधिक सक्षम, पारदर्शक बनवून ग्रामीण भागात शाश्वत विकास साध्य करता यावा, हे या पुरस्काराचे उद्दिष्ट आहे.

आरोग्यसंपन्न, दारिद्र्यमुक्त, बालस्नेही, जल समृद्ध, पर्यावरण स्नेही, पायाभूत सुविधांनीयुक्त, सामाजिक सुरक्षित व न्याय्य, सुशासनयुक्त व महिलास्नेही ग्रामपंचायत अशा ९ थीममध्ये उत्कृष्ट कार्य करणाऱ्या पंचायतींना हा पुरस्कार दिला जातो. या अंतर्गत खरीवली ग्रामपंचायतीस "जलसमृद्ध गाव" या थीममध्ये देशात प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळाले आहे. तर चांभार्ली ग्रामपंचायतीस "सामाजिकदृष्ट्या सुरक्षित व सामाजिक न्याय्य गाव" या थीममध्ये देशात संयुक्तपणे दुस-या क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त झाले आहे.



या पुरस्काराबद्दल रायगड जिल्हा परिषदेचे अध्यक्ष मंगेश वाकडीकर, उपाध्यक्ष मधुकर पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले व उपमुख्य कार्यक्रारी अधिकारी ग्रामपंचायत विशाल तनपुरे यांनी ग्रामपंचायत प्रशासन तसेच खालापूरचे गटविकास अधिकारी संदीप कराड यांचे अभिनंदन केले आहे.

# घरफोडी करणारे सराईत गुन्हेगार ताब्यात


## गुन्हे शाखा कक्ष ३ च्या पथकाची कारवाई

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहर परिसरात घरफोडी करणाऱ्या ५ जणांच्या टोळीपैकी तिघा जणांना गुन्हे शाखा कक्ष ३ च्या पथकाने ताब्यात घेतले असून त्यांच्या अटकेमुळे पनवेल परिसरातील घरफोडीचे गुन्हे उघडकीस आले आहेत.

पनवेल शहर परिसरात घरफोडी झाल्याच्या घटनांच्या तक्रारी पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आल्या होत्या. त्यामध्ये प्रामुख्याने कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादी यांचे राहते घराच्या सामानाचे खोलीची खिडकी उचकटून त्या





वाटे घरामध्ये प्रवेश करून घरातील लाकडी कपाटाचे दरवाजे उचकटून व लाकडी बेड मध्ये ठेवलेले ४०,००,०००/- रुपये किमतीचे सोन्याचे दागिने व रोख रक्कम घरफोडी चोरी करून नेल्याने वरील प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता. या घरफोडींचा समांतर तपास गुन्हे शाखा कक्ष ३ चे वपोनि अविनाश काळदाते यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि पवन नांद्रे, पोउपनि अभयसिंह शिंदे, पो.हवा.दिपक डोंगरे, सागर रसाळ, अजिनाथ फुंदे, लवकुश शिंगाडे, प्रसाद घरत आदींच्या पथकाने सदर आरोपींचा शोध सुरू केला असता सदर गुन्हयाचा केलेल्या तपासात घटनास्थळाच्या आजूबाजूचे सीसीटीव्ही फुटेज तपासले असता नमूद गुन्ह्यात एकूण पाच आरोपींचा सहभाग असल्याचे दिसून आले. सदर गुन्ह्याचे तांत्रिक तपासात गुन्ह्यातील तीन आरोपींना भाईंदर परिसरातून ताब्यात घेऊन त्यामध्ये ललित शाही (वय ३३), किशोर शाही (वय २९), शेर शाही (वय ३५) यांना ताब्यात घेतले असता त्यांनी त्यांचे सहकारी पाहिजे आरोपी भरत यादव व विष्णु शाही यांचे सह केले असल्याचे कबूल केले. त्यानुसार त्यांच्यावर कारवाई करण्यात आली आहे.

# अनधिकृत व्यवसायांवर कारवाई

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कळंबोली प्रभाग समिती ब मधील चर्च समोरील मुख्य रस्त्यावरील अनधिकृतपणे खाद्य पदार्थ विक्री करणारे, गाडीतून फळ विकणारे, नारळ विकणारे, आइसक्रीम गाडीवाले व नवीन पनवेल येथील फूटपाथवर चायनीज पदार्थ विक्री करणाऱ्यांवर अतिक्रमण पथकामार्फत ३० मार्च रोजी कारवाई करण्यात आली.

गेल्या काही दिवसांपासून महापालिकेच्या वतीने पालिका हद्दीतील चारही प्रभागातील अनधिकृत झोपड्या, शेड, फळ–



भाजी स्टॉल्सवर आयुक्त मंगेश चितळे यांनी दिलेल्या सूचनेनूसार उपायुक्त नानासाहेब कामठे यांच्या मार्गदर्शनाखाली मोठी तोडक कारवाई करण्यात येत आहेत.

सोमवारी रोडपाली बस डेपो येथे बसणारा आठवडा बाजार बंद ठेवण्यात आला. या बरोबरच कळंबोलीमधील फूटपाथवरील अनधिकृत फळे, भाजी विक्रेते तसेच इतर व्यवसाय स्टॉल्स वरही सातत्याने कारवाई करून फूटपाथ स्वच्छ करण्यात येत आहेत.

कळंबोली प्रभाग अधिकारी सहायक आयुक्त सुबोध ठाणेकर यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. यावेळी प्रभारी अधिक्षक राजेश डोंगरे, अतिक्रमण पथकातील सुपरवायझर, कर्मचारी उपस्थित होते.

# उलवे नोडच्या आगरी कोळी महोत्सवाला लोकनेते रामशेठ ठाकूर यांची उपस्थिती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त वाढदिवसानिमित्त भाजप पुरस्कृत आणि श्री गणेश सामाजिक मंडळ, गव्हाण यांच्या वतीने आयोजित 'आगरी कोळी महोत्सव' व 'सी–फूड फेस्टिवल' सध्या उलवे नोडमध्ये मोठ्या उत्साहात पार पडत आहे.

महोत्सवाच्या तिसऱ्या दिवशी माजी खासदार रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते कार्यक्रमाचा शानदार शुभारंभ करण्यात आला. यावेळी बोलताना त्यांनी सांगितले की, या महोत्सवाच्या माध्यमातून स्थानिक कलाकारांना स्वतःची कला सादर करण्यासाठी एक हक्काचे व्यासपीठ उपलब्ध झाले आहे, तर दुसरीकडे सी–फूड फेस्टिवलमुळे खवय्यांना आगरी–कोळी संस्कृतीतील चविष्ट पदार्थांची अनोखी मेजवाणी मिळत आहे.

महोत्सवाच्या तिसऱ्या दिवसाचे मुख्य आकर्षण ठरलेल्या सोलो आणि ग्रुप



डान्स स्पर्धांनी उपस्थितांच्या डोळ्यांचे पारणे फेडले.

या स्पर्धेदरम्यान श्रावणी ठाकूर हिने सादर केलेल्या नृत्याने प्रेक्षकांची मने जिंकली, ज्याची दखल घेत लोकनेते रामशेठ ठाकूर व मान्यवरांच्या हस्ते तिला बक्षीस देऊन तिला गौरविण्यात आले. तत्पूर्वी, कार्यक्रमाच्या सुरुवातीला आलेल्या पाहुण्यांचे पारंपारिक कोळी टोपी घालून स्वागत व सत्कार करण्यात आला. यावेळी पनवेल पंचायत समितीच्या सदस्या जिज्ञासा कोळी, अस्मिता पाटील, अनंता पाटील, प्रकाश नाईक यांसह विविध क्षेत्रांतील मान्यवर आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. रामशेठ ठाकूर मैदानावर सुरू असलेल्या या महोत्सवामुळे संपूर्ण परिसरात सध्या आगरी–कोळी संस्कृतीचा आणि खाद्यपरंपरेचा मोठा उत्साह पाहायला मिळत आहे.

# पनवेलकरांच्या पाणीटंचाईवर टँकरची मात्रा



**पनवेल महापालिकेतील पाणी समस्या मुळापासून दूर करण्यासाठी आमचे प्रयत्न जोरदारपणे सुरू आहेत. त्याचे तात्काळ परिणाम दिसत नसले तरी दीर्घकालीन पाणी दिलासा नक्कीच मिळेल. प्रत्येक वसाहतीमध्ये पाणी समस्या निर्माण झाल्यास त्या तक्रारींचे तातडीने निवारण करावे आणि गरज भासल्यास टँकरद्वारे पाणीपुरवठा करावा, यासाठी स्वतंत्र पाणी पथक स्थापन करून कार्यवाही करण्याची सूचना महापालिका आयुक्तांना दिल्या आहेत.**
**–नितीन पाटील,** महापौर, पनवेल महापालिका

**पनवेल : वार्ताहर**

खारघर, कामोठे आणि तळोजा या उपनगरांमध्ये तीव्र झालेल्या पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर पनवेल महापालिकेने सर्व प्रभागांमध्ये टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्याचा निर्णय घेतला आहे. महापौर नितीन पाटील यांच्या पाहणी दौऱ्यादरम्यान अनेक रहिवाशांनी पाणी प्रश्न भेडसावण्याच्या समस्येकडे लक्ष्य वेधले.

त्यानंतर महापौरांनी महापालिका प्रशासनाला तातडीच्या सूचना देत पिण्याच्या पाणी टंचाईवर उपाययोजना करण्यासाठी आपत्कालीन आराखडा तयार करण्याच्या सूचना दिल्या. खारघर, कामोठे आणि तळोजा परिसरातील नागरिकांना सध्या पिण्याच्या पाण्याची मोठी कमतरता भासत आहे. महापौरांच्या दौऱ्यादरम्यान नागरिकांनी पाणीपुरवठा सुरळीत करण्याची मागणी केली.

या मागण्यांची दखल घेत महापौरांनी स्पष्ट केले की, सिडको महामंडळाकडून पाणीपुरवठा सेवा हस्तांतरण झाले नसले तरी नागरिकांना पाणी देणे ही महापालिकेची जबाबदारी आहे. त्यामुळे ज्या प्रभागांमध्ये पाणीटंचाई आहे, तेथे तात्काळ पाहणी करून संबंधित गृहनिर्माण संस्थांना टँकरने पिण्याचे पाणी उपलब्ध करून द्यावे, असे निर्देश देण्यात आले.

या दरम्यान नागरिकांचे पाणी हाल टाळण्यासाठी महापौरांच्या सूचनेनंतर १ एप्रिलपासून प्रत्येक प्रभागात दोन टँकर राखीव ठेवण्याचे नियोजन करण्यात आले आहे. तसेच, पाणीपुरवठा विभागात अतिरिक्त मनुष्यबळ नेमून स्वतंत्र पथक तयार करण्यात येणार आहे. प्रत्येक प्रभागासाठी स्वतंत्र मोबाइल क्रमांक देऊन (न बदलणारे) तक्रारींचे नोंद व तत्काळ निराकरण केले जाईल. सुरुवातीला दिवसा सेवा सुरू करून नागरिकांच्या प्रतिसादानुसार ती २४ तास सुरू ठेवण्याचा विचार असल्याचे महापौरांनी स्पष्ट केले.



# गुळसुंदे येथे हनुमान जयंती उत्सव

**रसायनी : प्रतिनिधी**

गुळसुंदे येथे हनुमान जयंती उत्सव जोरदार चालू आहे. या देवस्थानचे १६८व्या वर्षी असून उद्या सकाळी हनुमानाच्या कीर्तन होत आहे आणि रात्री पालखी असा हा कार्यक्रम होत आहे. यामध्ये यावेळी सदानंद गोखले यांचे कीर्तन होत आहे.

सायंकाळी हळदी कुंकू आणि विविध कला गुणदर्शन हा कार्यक्रम असून रात्री साडेदहा वाजता श्रींचे पालखी उत्सव होत आहे, असे या कार्यक्रमाचे संस्थेचे अध्यक्ष प्रमोद विध्वंस यांनी माहिती दिली आहे.

# करंजाडे स्मशानभूमी येथे होणार विकासकामे



**पनवेल : वार्ताहर**

करंजाडे येथील स्मशानभूमी येथे सुविधा देण्याबाबत शिवसेना उप तालुकाप्रमुख गौरव गायकवाड यांच्या पाठपुराव्यानुसार खासदार स्थानिक क्षेत्र विकास कार्यक्रम अंतर्गत विकास कामे केली जाणार आहेत.

सिडकोने वसाहत निर्माण करीत असताना नागरी सुविधा देणे महत्वाचे आहे. सिडकोच्या दुर्लक्षमुळे स्थानिक नागरिकांना त्रासाला सामोरे जावे लागतं आहे. येथील स्मशानभूमी येथे दशक्रिया विधी शेड तसेच बैठक व्यवस्था व्हावी यासाठी करंजाडे येथील शिवसेना उप तालुकाप्रमुख गौरव गायकवाड यांनी खासदार श्रीरंग बारणे यांच्याकडे वारंवार पाठपुरावा करीत होते.

यावेळी खासदार बारणे यांनी या कामाला खासदार स्थानिक क्षेत्र विकास कार्यक्रम अंतर्गत निधीतून १५.०० लक्ष इतका निधी मंजूर केला आहे. याबाबतचे पत्र रायगड जिल्हाधिकारी यांना पाठविले आहे. त्याचबरोबर पत्र माऊली घोगरे यांनी रघुनाथ पाटील तालुका प्रमुख यांच्या समावेश गौरव सुरेश गायकवाड यांच्या कडे सुपूर्त केला व लवकरच कामाला सुरुवात होणार आहे.



**उरण : बाजारपेठेतील इनामदार हाउस, स्टेट बँक ऑफ इंडिया खाली असलेल्या मेत्ता होमिओ क्लिनिकचे उद्घाटन नगरसेविका सायली पाटेकर यांच्या हस्ते झाले. डॉ. निशा अरुण ओहोळ यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. या वेळी भाजप उरण शहर युवा सरचिटणीस विशाल पाटेकर, अरुण ओहोळ, कांचन ओहोळ, सुमित ओहोळ, चेतन गायकवाड आदी उपस्थित होते.**

# उरणमध्ये हनुमान जन्मोत्सव सोहळा

**उरण : वार्ताहर**

उरण शहर सह ग्रामीण भागात हनुमान जयंती मोठ्या उत्सवात साजरी केली जाते. उरण शहरातील हनुमान कोळीवाडा, मोरा कोळीवाडा, गणपती चौक येथे हनुमान जयंती साजरी केली जाते.

सालाबादप्रमाणे यंदाही गुरुवारी (दि.२) हनुमान जन्मोत्सव सामाजिक मंडळ याच्या वतीने श्री हनुमान जन्मोत्सव साजरा करण्यात येणार आहे. त्या निमित्ताने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

पहाटे ४ वाजता महापूजा, पहाटे ५ वाजता हभप सुधीर बाळ (रा.डोंबिवली) यांचे कीर्तन सकाळी ८ ते दुपारी १२ वाजेपर्यंत श्री गजाजन प्रसादिक भजन मंडळ यांचे भजन, दुपारी १२ ते ३ वाजेपर्यंत कै.सुनिता ढोले व कै.मीना रूपचंदानी यांच्या स्मरणार्थ महाप्रसाद चे आयोजन सायंकाळी ४ ते ७ शारदा संगीत भजन मंडळ यांचे भजन, रात्री ९ वाजता पालखी मिरवणूक काढण्यात येणार आहे.

हनुमान जन्मोत्सव सामाजिक मंडळचे अध्यक्ष अशोक कडू, उपाध्यक्ष महेश अधिकारी, सचिव ॲड.रोहित पाटील, खजिनदार धनजंय भागवत महाराज, सहसचिव ॲड.रेखा पाटील, सल्लगार विठ्ठल ममताबादे, सहखजिनदार मनोज म्हात्रे, रघुनाथ बुवा हातनोलकर, चंद्रकांत साठे, महादेव ढोले, विनोद रुपचंदानी, अरुण मोदी, गजानन भोईर, नितीन वर्तक व कार्यकारी महिला सभासद सुविधा म्हात्रे, प्राजक्ता भागवत, मिलिंद माळी व सर्व भक्तांना सामाजिक कार्यकर्ते कल्पेश ठक्कर यांच्या वतीने खिचडीचे वाटप होणार आहे.

# माधवी वरूणकर, मधु मोरे यांचे शिक्षक पात्रता परीक्षेत सुयश

**कळंबोली : बातमीदार**

केंद्रीय शिक्षक पात्रता परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून कळंबोलीतील सुधागड विद्या संकुलातील मराठी प्राथमिक विद्यालयातील सहाय्यक शिक्षिका माधवी सुरेंद्र वरून कर व मेघा मधुकर मोरे यांनी घवघवीत यश संपादन केले आहे.

या परीक्षेत माधवी सुरेंद्र वरूणकर यांनी शिक्षक पात्रता भाग एक व भाग दोन परीक्षा उत्तीर्ण झाल्याने त्यांना भविष्यातील पदोन्नतीचा मार्ग सुकर झालेला आहे. या दोन्ही शिक्षकांनी मिळवलेल्या अपूर्व यशाबद्दल विद्यालयाच्या मुख्याध्यापिका वनिता लक्ष्मण कोळी यांनी व अन्य सहकारी शिक्षकांनी अभिनंदन केले आहे.

CTET (केंद्रीय शिक्षक पात्रता परीक्षा) ही केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाद्वारे (CBSE) द्वारे, राष्ट्रीय स्तरावरील शिक्षक पात्रता ऑफलाइन परीक्षा घेण्यात आली होती. ७ व ८ फेब्रुवारी २०२६ रोजी झालेल्या परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला. सुधागड एज्यु. सोसायटी कळंबोली येथील प्रा. विभागात कार्यरत असणाऱ्या शिक्षिका माधवी सुरेंद्र वरूणकर ह्या पेपर–१ आणि पेपर –२. दोन्हीही परीक्षा उत्तीर्ण होऊन तर मेघा मधुकर मोरे ह्या पेपर १ उत्तम गुणांनी उत्तीर्ण होऊन घवघवीत यश संपादन केलेले आहेत.

शिक्षक पात्रता परीक्षेच्या संदर्भात शिक्षकांमध्ये वेगवेगळी मतमतांतर व उलट सुलट प्रतिक्रिया उमटल्या होत्या मात्र न्यायालयाने सदरची परीक्षा ही सर्वांनाच बंधनकारक अनेक सक्तीची केल्याने अखेरीस शिक्षकांनी सदरची परीक्षा देण्याचा निर्णय मान्य केला. भविष्यामध्ये पदोन्नतीचा लाभ मिळू शकणार आहे.



# केएलई कॉलेजमध्ये वार्षिक विधी महोत्सव स्पार्कल उत्साहात

**पनवेल : वार्ताहर,**
**कळंबोली : बातमीदार**

केएलई सोसायटी, केएलई कॉलेज ऑफ लॉ, नवी मुंबई, कळंबोली यांनी २७ ते २९ मार्च २०२६ दरम्यान त्यांच्या वार्षिक विधी महोत्सव स्पार्कल ७.० चे यशस्वी आयोजन केले.

देशभरातील नामांकित विधी महाविद्यालयांतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सहभाग लाभलेल्या या तीन दिवसीय महोत्सवाने विधी क्षेत्रातील अनुभवाधारित शिक्षण, वकिली कौशल्ये आणि व्यावसायिक उत्कृष्टतेला प्रोत्साहन देणारे महत्त्वपूर्ण व्यासपीठ उपलब्ध करून दिले. मूट कोर्ट स्पर्धेत ४४ संघांनी तर क्लायंट काउन्सेलिंग स्पर्धेत २० संघांनी सहभाग नोंदवला.

देशातील विविध प्रतिष्ठित विधी संस्थांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या १८० हून अधिक विद्यार्थ्यांनी या स्पर्धांमध्ये सहभाग घेतला. या दोन्ही स्पर्धा प्रत्यक्ष जीवनातील कायदेशीर परिस्थितींचे अनुकरण करत



विद्यार्थ्यांच्या व्यावहारिक कौशल्यांचा विकास करण्यासाठी आयोजित करण्यात आल्या होत्या.

न्यायमूर्ती विश्वनाथ व्ही. अंगडी (माजी जिल्हा न्यायाधीश व माजी प्राचार्य, सिटी सिव्हिल आणि सत्र न्यायालय, कर्नाटक) यांची प्रमुख उपस्थिती लाभली. ते समारोप समारंभालाही उपस्थित होते यावेळी अमिटी युनिव्हर्सिटीचे कुलगुरू प्रा. डॉ. ए. डब्ल्यू. संतोष कुमार यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. श्रीलंकेच्या सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती एस. थुरैराजा, बॉम्बे हायकोर्टचे न्यायमूर्ती श्रीराम शिर्साट तसेच कर्नाटक उच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती बी. ए. पाटील यांनी उपस्थित राहून अंतिम फेरीचे परीक्षण केले.

न्यायमूर्ती एस. थुरैराजा यांनी महोत्सवाच्या उत्कृष्ट आयोजनाचे कौतुक करत विद्यार्थ्यांमध्ये दिसणारा उत्साह आणि आनंद अधोरेखित केला. त्यांनी शैक्षणिक अभ्यासाबरोबरच सहशैक्षणिक उपक्रमांचे महत्त्वही स्पष्ट केले. न्यायमूर्ती बी. ए. पाटील यांनी विधी क्षेत्रातील बदलांवर प्रकाश टाकत विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. मा. न्यायमूर्ती विश्वनाथ व्ही. अंगडी यांनी कार्यक्रमाच्या नियोजनाचे कौतुक करत भविष्यात या महोत्सवात ३०० पेक्षा अधिक महाविद्यालयांचा सहभाग होईल, असा विश्वास व्यक्त केला.

मूट कोर्ट स्पर्धेत व्ही इ एस कॉलेज ऑफ लॉ यांनी उत्कृष्ट संशोधन, मांडणी व युक्तिवादाच्या जोरावर विजेतेपद पटकावले. तर क्लायंट काउन्सेलिंग स्पर्धेत अलायन्स युनिव्हर्सिटी यांनी प्रभावी संवाद कौशल्ये आणि समस्या सोडवण्याच्या क्षमतेच्या आधारे विजेतेपद मिळवले. या महोत्सवाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना तर्कशक्ती, न्यायालयीन कौशल्ये आणि व्यावसायिक नैतिकता विकसित करण्याची संधी मिळाली. विद्यार्थ्यांशी संवाद साधण्याची मौल्यवान संधीही उपलब्ध झाली, ज्यामुळे त्यांच्या शैक्षणिक व व्यावसायिक प्रवासाला नवी दिशा मिळाली.

# मोहोपाडा येथे 'अंनिस'चे कवी संमेलन

**रसायनी : प्रतिनिधी**

अंनिसचे जिल्हा स्तरीय कवी संमेलन रविवार दि.२९ मार्च रोजी पार पडले.कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे जेष्ठ कवी व कोमसापचे विश्वस्त प्रा.एल.बी.पाटील तर उद्घाटन मोहोपाड्याच्या सरपंच उमाताई मुंढे होत्या.

मोहोपाडा अंनिसच्या कार्याध्यक्षा माधुरी कांबळे,सांस्कृतिक विभाग कार्यवाह रोहिदास कवळे व महा.अंनिसच्या राज्य सरचिटणीस आरती नाईक यांनी प्र.पाहुणे व उद् घाटक आणि मान्यवरांचे स्वागत केले.आरती नाईक यांनी प्रास्ताविक केले.

भाषणात त्यांनी सांगितले की, श्रद्धा असावी पण अंधश्रद्धा नसावी. प्रमुख पाहुणे प्रा.एल बी.पाटील यांनी त्यांची 'इव्हाण' या गायलेल्या कवितेने हास्याची लकेर उसळली. यानंतर रायगड जिल्ह्यातून विविध ठिकाणांहून आलेल्या २४ कवींनी 'अंधश्रद्धा निर्मूलन आणि सामाजिक आशयाच्या' कविता सादर करून श्रोत्यांची वाहवा मिळविली.

परीक्षक डॉ.राजेंद्र राठोड व महेंद्र पाटेकर यांनी काटेकोरपणे परीक्षण करून तीन क्रमांक व विशेष उल्लेखनीय दोन क्रमांक निश्चित केले व दोन्ही परीक्षकांनी ही त्यांच्या दोन कविता सादर केल्या त्यांनाही रसिकांची दाद मिळाली. प्रथम क्र.अनिल सोनवणे, द्वितीय क्र.महेंद्र नाईक, तृतीय क्र.प्रतिभा रननवरे यांनी प्राप्त केला. मान्यवरांच्या हस्ते पुस्तिका व संविधान प्रत देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. सर्व सहभागी कवींना प्रमाणपत्र देण्यात आले.

संमेलनास अन्य मान्यवर चैतन्य उषा लक्ष्मण पाटील,मच्छिंद्र म्हात्रे व अंनिस चौक व पनवेल शाखांचे पदाधिकारी उपस्थित होते. मोहोपाडा अंनिस शाखेच्या अध्यक्षा डॉ.मेघा देशपांडे यांचे कवी संमेलनास महत्वाचे सहकार्य मिळाले. मोहोपाडा अंनिस शाखेच्या कार्याध्यक्षा माधुरी कांबळे, प्रधान सचिव राजश्री लोखंडे, महिला विभाग प्रमुख अनिता गायकवाड, सांस्कृतिक विभाग कार्यवाह रोहिदास कवळे, विज्ञान जाणीव प्रकल्प कार्यवाह बाळासाहेब सावर्डे, राज्य सरचिटणीस आरती नाईक आदींची उपस्थिती होती. अनिता गायकवाड यांनी सूत्रसंचालन केले. बाळासाहेब सावर्डे यांनी आभार मानले.

## संपादकीय

# प्रयत्नांची पराकाष्ठा

अमेरिका–इस्रायल–इराण युद्धाच्या झळा संपूर्ण जगाला जाणवत असून भारतालाही या युद्धामुळे आर्थिक संकटाला तोंड द्यावे लागेल असा इशारा अर्थतज्ज्ञ देऊ लागले आहेत. युद्धाचे तीव्र प्रतिकूल परिणाम कमी करण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले जात आहेत अशा शब्दांत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही युद्धाच्या परिणामांचे गांभीर्य अलीकडेच जनतेसमोर मांडले होते. जागतिक बाजारात खनिज तेलाच्या किंमती भडकल्याने देशातील महागाईवर नियंत्रण ठेवण्यासाठी सरकारला प्रयत्नांची पराकाष्ठा करावी लागणार असे दिसते आहे.

**अमेरिका व इस्रायलने इराणविरोधात संयुक्तपणे पुकारलेल्या युद्धाचे दुष्परिणाम दीर्घकाळ जाणवणार असले तरी देशातील जनतेवर त्याचा कमीत कमी बोजा पडेल याची दक्षता आमचे सरकार घेते आहे अशी ग्वाही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिली आहे. कुठल्याही संकटाचा मुकाबला करण्याची क्षमता भारतात आहे असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला आहे. परंतु आजच्या काळात कुठल्याच युद्धाचे परिणाम निव्वळ संबंधित देशांपुरते सीमित राहात नाहीत. सरकारने पेट्रोल व डिझेलच्या दरातील वाढ टाळण्याचा प्रयत्न आतापर्यंत केला असला तरी अमेरिका–इस्रायल–इराण युद्धामुळे गेले काही दिवस भारतात गॅस सिलेंडरची टंचाई काही प्रमाणात जाणवत असून व्यावसायिक सिलेंडरच्या दरात बुधवारी पुन्हा वाढ करण्यात आली. घरगुती गॅस सिलेंडरच्या उपलब्धतेबाबत सरकारकडून जनतेला सातत्याने माहिती दिली जात असून जनतेला घाबरून न जाण्याचे आवाहनही सरकारकडून केले जाते आहे. देशभरातील व्यावसायिक सिलेंडरचे दर आता दोन हजार रुपयांच्या पुढे गेले असून घरगुती गॅस सिलेंडरचे दर मात्र स्थिर आहेत. अमेरिका–इस्रायल व इराण यांच्यातील युद्धामुळे देशातील परकीय चलनाच्या गंगाजळीवरही परिणाम संभवतो अशी भीती अर्थतज्ज्ञ व्यक्त करीत आहेत. पश्चिम आशियातील युद्धाचा बुधवारी ३३वा दिवस होता. तज्ज्ञांच्या मते, पश्चिम आशियातील हा संघर्ष आता तातडीने थांबला तरीही त्याचे परिणाम येत्या काळात जाणवतच राहणार आहेत. ऊर्जेच्या पुरवठा साखळीतील अडथळे आणि साठवणुकीच्या समस्यांमुळे येणाऱ्या काळातही खनिज तेलाच्या किंमती उच्च पातळीवरच राहण्याचा अंदाज आहे. परिणामी आगामी काळात देशात पेट्रोल–डिझेलच्या किमतीत मोठी वाढ होण्याची शक्यता आहे. सरकारने नुकतीच केलेली उत्पादन शुल्क कपात आणि खते, इंधन व अन्नावरील वाढीव अनुदानामुळे सरकारी तिजोरीवर दीड ते दोन लाख कोटी रुपयांचा अतिरिक्त भार पडणार आहे. या आर्थिक संकटाचा सामना करण्यासाठी केंद्र सरकारकडून नुकत्याच सुरू केलेल्या १ लाख कोटी रुपयांच्या विशेष निधीचा वापर होण्याची शक्यता आहे. आगामी काळात खनिज तेलाच्या किंमतीत जागतिक स्तरावर जेवढी वाढ होईल त्यातील बोजा काही प्रमाणात तरी ग्राहकांच्या खिशावर पडण्याची शक्यता अर्थतज्ज्ञांकडून वर्तवली जाते आहे. पश्चिम आशियातील संघर्ष आणखी लांबल्यास भारताच्या विकास दरालाही मोठा फटका बसू शकतो असा अंदाज एका नामांकित बँकेच्या तज्ज्ञांनी व्यक्त केला आहे. खनिज तेलाच्या किमती कमी न झाल्यास देशातील विकासाचा दर २०२५–२६ मधील ७.५ टयांच्या तुलनेत ६.५ टयांपर्यंत खाली येऊ शकतो असे तज्ज्ञांचे म्हणणे आहे. जागतिक बाजारातील नकारात्मक वातावरणामुळे आगामी काळात डॉलरच्या तुलनेत रुपया आणखीन कमकुवत होऊ शकतो. मात्र, भारतीय रिझर्व्ह बँक व्याजदरातील बदल, जीएसटी दरातील कपात, अन्नधान्यातील महागाईत घट आणि कृषी क्षेत्रातील सकारात्मक प्रवाह यामुळे रुपयाला काही प्रमाणात आधार मिळू शकतो असेही तज्ज्ञांचे म्हणणे आहे.**

# पोलादपूर तालुक्यात 'कण वाळूचे रगडिता तेलही गळे'

पोलादपूर तालुक्यातील सावित्री, ढवळी, कामथी, घोडवनी आणि चोळई नद्यांची पात्र तीव्र डोंगरउतारामुळे वेगवान असल्याने नदीच्या दूतर्फा असलेल्या काठांची झीज मोठ्या प्रमाणावर करीत असतात. याचा परिणाम, या नद्या पावसाळ्यात पूरस्थितीसोबत भूस्खलन करीत असतात तर पावसाळ्यानंतर कोरडया पडलेल्या दिसत आहेत. नद्यांच्या पात्रातील दगड–गोटे आणि वाळू यांचा वेळीच उपसा झाला नाही तर नद्यांचे प्रवाह पूरस्थितीमध्ये पात्रांची दिशा बदलून दूतर्फा असलेल्या लोकवस्ती आणि शेतीला धोका पोहोचवित असल्याचे २००५ च्या अतिवृष्टीदरम्यान पाहण्यास मिळाले आहे.




भूगर्भ शास्त्रज्ञांनी पोलादपूर तालुक्याची अतिवृष्टीमुळे संभाव्य हानीच्या कारणांत भूस्खलन केवळ डोंगर उतारांवर गृहित धरले असल्याने तुटवलीसारख्या दरडग्रस्त गावातील आपद्ग्रस्तांनी नव्याने दुसऱ्या जागी घर उभारूनही ती जागा भूगर्भ शास्त्रज्ञांच्या अहवालानुसार दरडग्रस्त असल्याने त्यांना घरबांधकामाच्या अनुदानाचा दुसरा टप्पा देण्यात आला नाही. नद्यांची पात्र उथळ असल्याने दगड–गोटे यांचा बांधकामासाठी मोठया प्रमाणात विनामूल्य वापर करून देण्यात सरकारला नद्यांची गाळसफाई करण्यासाठी टंचाई निवारण आराखडयानुसार खर्च करण्याचे टाळता येणार आहे. रेतीही पूरस्थिती निर्माण करण्यास कारणीभूत असून पोलादपूर तालुक्यात ४ ब्रास दगड–गोटयांसोबत १ ब्रास रेती उपसा करण्याची परवानगी देण्याची गरज आहे. बांधकामास ही वाळू अयोग्य असल्याचा सार्वजनिक बांधकाम विभागाच्या पोलादपूर उपविभागाचा सरकारी अहवाल आहे तरीही वाळूच उपलब्ध नसल्याने पोलादपूर तालुक्यात या लाल मातीमिश्रित वाळूला गरजेपोटी कमालीची मागणी आहे.

**खबरबात**
**शैलेश पालकर**

पोलादपूर तालुक्यामध्ये सध्या वाळू उपसा करणारे आदिवासी श्रमजीवी आणि अन्य कामगारांना मिळणारा मोबदला आणि त्यातुलनेत वाळूची वाहतूक करणाऱ्यांना 'रिस्क फॅक्टर'ला सामोरे जाण्यास लागण्याच्या अधिकाधिक शक्यता असल्याने अधिक लाभ होत आहे. मात्र, तरीही केवळ वाहनजप्ती आणि दंडात्मक कारवाईपोटी ही रिस्क सोपी करण्यासाठी यंत्रणेच्या खडखडाटावर वंगण घालण्यासाठी अवाजवी बेकायदेशीर मोबदला द्यावा लागत असल्याने रेजगा, गोटे आणि वाळूयुक्त नदीपात्रांत चाळण लावून वाळूचे कण रगडून ग्राहकांची मागणी पूर्ण करणाऱ्या हातपाटी व्यावसायिकांच्या रक्ताचे पाणी आणि इतर अनेकांना त्यापासून गळणारे तेल यंत्रणांच्या कारवाईचा खडखडाट थांबविण्यास उपयुक्त ठरत आहे.

पोलादपूर तालुक्यात पर्यावरणाचा समतोल केवळ नद्यांची पात्रे उथळ राहिल्याने पूरस्थिती अथवा पूरपातळी वाढून ढळू शकतो.



पाणीटंचाई निवारणदेखील ही पात्रे खोल होण्यासाठी वाळू, दगड–गोटे उपसा करण्यावरच अवलंबून आहे. त्यामुळे पर्यावरणाचा समतोल ढळतो हा निकष या तालुक्यात लागू नाही. नद्यांतील डोहांमध्ये विपुल प्रमाणात मिळणार गोडया पाण्यातील मासे हे डोह उथळ झाल्याने आता पुरेसे मिळत नाहीत. यामुळे वाळू व गोटे उपसाबंदीच येथील पर्यावरणाचा समतोल बिघडविण्यास कारणीभूत आहे. भूस्खलनाच्या अहवालामुळे दगड आणि डबर खणण्यासही बंदी असल्याने यासाठी दंडात्मक कारवाईला सामोरे जात बांधकाम व्यावसायिक त्यांच्या कामांची सुरूवात करीत आहेत. यामुळे 'गव्हर्निंग सिस्टीम'च्या 'इन्फ्रास्ट्रक्चर'वर चांगले परिणाम होताना दिसले तरी तरी सरकारकडे प्रत्यक्षात अपेक्षित महसूल गोळा होण्यास ही सिस्टीमच अडथळा ठरू शकते.

पूर्वी राजकीय पक्षांकडून रेती माफियांविरोधात कारवाईची मागणी झाल्यानंतर त्यातील अर्थ समजून वर्तन करणाऱ्या वाळू उत्पादकांच्या हालचाली पाहता आता वाळू उत्पादकच राजकारणात सक्रीय झाल्याने तसेच ठेकेदारदेखील राजकीय पक्षांमध्ये सक्रीय दिसू लागल्याने राजकीय पक्षांना विरोधकांच्या भूमिकेतदेखील शांत राहण्यात अर्थ गवल्याचे दिसून येत आहे. पोलादपूर तालुक्यातील वाळू बांधकामास उपयुक्त नसूनही सरकारी कामांच्या ठेकेदारांना सिमेंटमध्ये मिसळून कॉंक्रीट करेपर्यंत संबंधित कामाकडे कानाडोळा करण्यासाठीचे शुल्क सार्वजनिक बांधकाम विभागाच्या शाखा अभियंत्यांना मोजण्याची मानसिकता बाळगावी लागत असल्याचे उघड झाले आहे.

अलिकडेच, पोलादपूर तालुक्यात घरकुले बांधकामाचा मोठा कार्यक्रम सुरू झाला असून तालुक्यात सुमारे १०३ घरकुलांच्या उभारणीकरीता रेती, विटा, सिमेंट तसेच कॉंक्रीटचे पत्रे आणि लोखंडी पाईप यांची मागणी वाढली आहे. मात्र, पोलादपूर तालुक्यातील लालमातीमिश्रीत वाळू इमारत, तसेच कॉंक्रीटच्या बांधकामाकरीता उपयुक्त नसल्याचा निर्वाळा सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत देण्यात आलेला असूनही घरकुलांसाठी शासनस्तरावर २ ब्रास वाळू मोफत देण्याचा निर्णय झाला असताना हीच लालमाती मिश्रीत वाळू उपलब्ध करून देण्याचा एकमेव पर्याय तालुक्यातील गरीब जनतेसमोर आहे. अशातच, पोलादपूर तालुक्यातील वाळू, विटांना कडेच्या सातारा जिल्ह्यातील महाबळेश्वर, पाचगणी आणि वाडा कुंभरोशी भागात चांगला भाव मिळत असल्याने गेल्या अनेक वर्षांपासून तिकडेच पुरवठा करण्याची मानसिकता वाढीस लागली आहे. परिणामी, गोरगरीब जनतेला ही वाळू देखील उपलब्ध करण्याऐवजी सातारा जिल्ह्यातच रवाना करण्याकडे वाळू उपसा व्यावसायिकांचा कल दिसून येत आहे.

पोलादपूर तालुक्यामध्ये सावित्री, ढवळी, कामथी, घोडवणी आणि चोळई नद्यांच्या आणि उपनद्यांच्या पात्रामध्ये मोठया प्रमाणात वाळू उत्खनन होत असून वाळू उपसा करणाऱ्या व्यावसायिकांची नोंदणी कृत संघटना देखील तालुक्यात गेल्या पंधरा वर्षांपासून कार्यरत आहे. या संघटनेच्या माध्यमातून वाळू उपसा करणाऱ्या व्यावसायिकांना उद्भवणाऱ्या समस्यांचे 'अर्थपूर्ण' निवारण करण्यात येत आहे. या संघटनेचे नेतृत्व करणाऱ्या व्यक्तीमार्फत यासाठी मोठया प्रमाणात 'सिक्युरिटी अमाऊंट' संकलित करण्यात येत असते. आयत्या वेळीचे विषय हाताळण्यासाठी या 'सिक्युरिटी अमाऊंट'चा उपयोग लीलया केला जात असतो. त्यामुळे विषय पत्रिकेवरील विषय दरमहा हाताळून झाल्यानंतर उरलेल्या मोठया रकमेला आयत्या वेळीचे विषय न उद्भवल्यास कोणीही मायबाप नसल्याने 'सिक्युरिटी अमाऊंट' संकलित करणाऱ्याकडेच ती पडून राहत असते, ही बाब ज्या यंत्रणांना तसेच माध्यमांना माहिती झाली आहे त्यांनी आयत्या वेळीचे विषय वाढवण्यासाठी 'कण वाळूचे रगडिता तेलही गळे' म्हणीप्रमाणे तेल काढण्याचे प्रयत्न केले आहेत.

## बदलते तंत्रज्ञान



# चॅट जीपीटीवर अजुनही चालतोय घिब्ली फोटोंचा ट्रेंड

सध्या सोशल मीडियावर घिब्ली Art फोटो ट्रेंडचा महापूरच आल्याचे दिसत आहे. घिब्लीने संपूर्ण जगाला वेड लावले आहे. घिब्ली Art फीचरने धुमाकूळ घातला आहे. सर्वच जण घिब्ली Art मध्ये आपला कार्टून फोटो क्रिएट करून सोशल मीडियावर शेअर करत आहे. एआय प्लॅटफॉर्म चॅट जीपीटीच्या माध्यमातून जवळपास प्रत्येक व्यक्ती फोटोवरून ॲनिमेशन




बनवत आहे. लोक स्वतःचे, त्यांच्या पाळीव प्राण्यांचे आणि त्यांच्या सभोवतालच्या ठिकाणांचे फोटो घिब्ली प्रतिमांमध्ये रूपांतरित करत आहेत.

### घिब्ली स्टाइल म्हणजे काय?

स्टुडिओ घिब्ली हे एक इमेज जनरेशन टूल आहे. चॅट जीपीटीच्या या वैशिष्ट्याद्वारे, युजर्स त्यांचा कोणताही आवडता फोटो, चित्रपटातील फोटो किंवा कोणत्याही लोकप्रिय मीमला स्टुडिओ घिब्लीच्या फोटोमध्ये रूपांतरित करू शकतात. नुकतेच ओपन एआयने चॅट जीपीटी प्लस, प्रो आणि टीम वापरकर्त्यांसाठी इमेज जनरेशन फीचर लॉंच केलं आहे, ज्यामुळे इंटरनेटवर नवीन ट्रेंड सुरू झाला आहे, ज्यामध्ये तुम्ही तुमचे खरे फोटो जपानच्या प्रसिद्ध स्टुडिओ घिबलीच्या ॲनिमेटेड स्टाईलमध्ये करू शकता. घिब्ली कला म्हणजे स्टुडिओ घिब्लीच्या अनोख्या शैलीतील छायाचित्रे आहेत. ज्यामध्ये पेस्टल आणि म्यूट कलर पॅलेट आणि गुंतागुंतीच्या तपशीलांचा वापर केलेला असतो. ही दृश्य शैली तिच्या सर्जनशील खोलीमुळे आणि कथाकथनाच्या आकर्षणामुळे ॲनिमे चाहत्यांमध्ये लोकप्रिय झाली आहे. चॅट जीपीटी वापरून घिब्ली स्टाइल इमेज कशा तयार कराव्यात? हे करा–

तुमच्या फोनवर चॅट जीपीटीॲप उघडा. तुम्हाला हवे असल्यास तुम्ही चॅट जीपीटी वेबसाइटदेखील वापरू शकता.

ईमेल आयडी किंवा फोन नंबर वापरून ॲपमध्ये लॉग इन करा. यानंतर फोटो आणि त्याचे तपशिलवार वर्णन प्रविष्ट करा.

इमेज जनरेट करण्यासाठी प्रॉम्प्ट सबमिट करा. काही सेकंदात एआय इमेज तयार होईल. तुम्ही चित्र सेव्ह किंवा शेअर करू शकता.

# नाट्यअभिनेते डॉ. काशिनाथ घाणेकर

डॉ. काशिनाथ घाणेकर हे मराठी नाट्यअभिनेते व हिंदी–मराठी चित्रपट अभिनेते होते. अभिनय सुरू करण्याआधी घाणेकर व्यवसायाने दंतवैद्य होते. काशीनाथ घाणेकर यांचा जन्म १४ सप्टेंबर १९३२ रोजी चिपळूण येथे झाला आणि तिथेच त्यांनी शिक्षण पूर्ण केले.

सन १९६० ते १९८० या काळातले ते मराठीतले पहिले सुपरस्टार होते. स्त्रीरोगतज्ज्ञ इरावती कर्णिक या काशिनाथांच्या पहिल्या पत्नी होत. त्यांच्याशी घटस्फोट घेतल्यावर काशिनाथ घाणेकर यांनी अभिनेत्री सुलोचनाबाईंची कन्या कांचन लाटकर यांच्याशी लग्न केले. कांचन घाणेकरांनी स्वतःच्या वैवाहिक सहजीवनावर 'नाथ हा माझा' नावाचे पुस्तक लिहिले आहे.

आपल्याच नजरेत आपले आदरयुक्त व्यक्तित्व उभारण्याच्या अट्टाहासापोटी आयुष्याच्या शेवटपर्यंत झगडणारे, वैद्यकीय व्यवसायाद्वारे समाजात इज्जत मिळवून सत्कारयुक्त जीवन जगण्याऐवजी रंगमंचावर आपले श्वास शोधणारे, मराठी रंगभूमीवरचा सुपरस्टार होऊनही वडिलांच्या कौतुकाच्या शब्दासाठी पात्र न ठरणारे आणि ते दुःख आयुष्यभर कवटाळून रंगमंचावर अवतरल्यानंतर मिळणार्या टाळ्या आणि शिट्ट्यांच्या धुंदीत आपले आयुष्यच



**निमित्त**

उधळून लावणारे, असे त्यांच्या व्यक्तित्वाचे धागे भल्याबुर्या व कुरुपतेच्या सर्व रंगांसह विणले गेले. डॉ. काशिनाथ घाणेकर यांनी आपल्या आयुष्याची क्षणभंगुरता आपल्या परीने याच निरर्थक हातवारे आणि तुर्रेबाजीने आपल्या परीने अर्थपूर्ण बनवली. त्यांचे अस्तित्व त्या रंगभूमीवर वावरण्याभोवती होते आणि त्यांचे प्राण समोरच्या गर्दीत होते. सन १९६० ते १९८० या कालावधीत काशिनाथ हे मराठी नाट्य–चित्रसृष्टीचे पहिले सुपरस्टार होते आणि त्याकाळात ते सर्वात जास्त मानधन घेणारे अभिनेते होते. दादी माँ या १९६६ साली निघालेल्या हिंदी चित्रपटात काशिनाथ घाणेकर यांनी अशोक कुमार आणि बीना रॉय यांच्या मुलाची एक छोटी भूमिका केली होती.

वसंत कानेटकर यांनी लिहिलेल्या 'रायगडाला जेव्हा जाग येते' या नाटकातल्या संभाजी महाराजांच्या भूमिकेनंतर घाणेकरांना अफाट लोकप्रियता लाभली. या नाटकाशिवाय त्यांनी इतर अनेक नाटकांमध्ये उत्तम अभिनय केला.

सन १९६८ मध्ये निघालेल्या 'मधुचंद्र' या मराठी चित्रपटापासून काशीनाथ घाणेकर मराठी चित्रपटसृष्टीतील एक मोठे अभिनेते बनले. नाटक रंगमंचावर पहिली शिट्टी पडली ती काशिनाथ घाणेकर यांना. ज्यांच्या प्रवेशानेच टाळ्यांच्या कडकडाटात नाट्यगृहे दणाणून जात होती. त्यांच्या नावाने मराठी रसिकांना अक्षरशः वेड लावले होते. त्यांनी मराठी व्यावसायिक रंगभूमीला वैभवाचे दिवस आणले, अनेक तरुण अभिनेत्यांसाठी ते प्रेरणादायी ठरले.

प्रभावशाली संवादफेक, जरब बसणारे डोळे आणि विशिष्ट पद्धतीने बोलण्याची त्यांची शैली अद्वितीय होती. 'रायगडाला जेव्हा जाग येते', 'इथे ओशाळला मृत्यू', 'अश्रूंची झाली फुले', 'गारंबीचा बापू', या आणि अशा अनेक नाटकांमधील त्यांच्या भूमिका जबरदस्त गाजल्या.'देवमाणूस','पाठला ग','मधुचंद्र','सुखाची सावली','मानला तर देव', या मराठी चित्रपटांमध्येही त्यांनी अभिनय केला. अशा या महान अभिनय सम्राटाचे २ मार्च १९८६ रोजी निधन झाले.

**साभार : इंटरनेट**

## चित्र रंगवा



# आरोग्य प्रहर

## कोलेस्ट्रॉल वाढतंय... आवळ्याचे सेवन करा

आजकालच्या धावपळीच्या जीवनशैलीमुळे आणि चुकीच्या आहारामुळे वाईट कोलेस्ट्रॉलची पातळी वाढते आहे. मानवाच्या शरीरात दोन पद्धतीचे कोलेस्ट्रॉल असतात. यामध्ये लो डेंसिटी लिपोप्रोटीन याला वाईट कोलेस्ट्रॉल मानलं जातं, तर दुसरीकडे हाई डेंसिटी लिपोप्रोटीन शरीरातील चांगलं कोलेस्ट्रॉल असतं. ङऊङ नेहमी कमी असलं पाहिजे, असा सल्ला तज्ज्ञांकडून दिला जातो. ङऊङ कोलेस्ट्रॉल शरीरासाठी हानिकारक आहे आणि यामुळे हृदयरोग, उच्च रक्तदाब आणि इतर गंभीर आरोग्य समस्या होऊ शकतात. पण, आवळा खाल्ल्याने 'खराब कोलेस्ट्रॉल' झपाट्याने कमी होऊ शकतो का, संशोधन काय सूचित करते, जाणून घेऊया



वेगवेगळ्या फळांमध्ये आवळा खूप फायदेशीर फळ मानलं जातं. आवळ्याचे आरोग्याला अनेक फायदे मिळतात. आवळ्यामध्ये वेगवेगळे व्हिटॅमिन्स भरपूर असतात. यात कॅल्शिअमही भरपूर असतं. आवळ्यामध्ये असलेलं व्हिटॅमिन सी अँटी–ऑक्सिडेंटसारखं काम करतं. याने फ्री रॅडिकल्स, अँटी–इन्फ्लेमेटरी आणि अँटी–मायक्रोबिअल तत्व वाढतात, ज्यामुळे इम्यून सिस्टीमचा प्रभाव वाढतो व तुमचा अनेक आजारांपासून बचाव होतो.

आवळ्याचे नियमित सेवन केल्याने एलडीएल कोलेस्ट्रॉल लक्षणीयरीत्या कमी होते तर एचडीएल (हाय–डेन्सिटी लिपोप्रोटीन) कोलेस्ट्रॉल वाढते, ज्याला सामान्यतः चांगले कोलेस्ट्रॉल म्हणतात. एचडीएल रक्तप्रवाहातून एलडीएल फिल्टर करण्यास मदत करते, ज्यामुळे हृदयरोगाचा धोका कमी होतो. आवळ्याचे दाहकविरोधी गुणधर्म धमनीची जळजळ कमी करण्यास मदत करतात.

**आवळ्याचे सेवन कोलेस्ट्रॉल कमी करण्यासाठी किती प्रमाणात करावे?**

ताजा आवळा : दररोज १–२ आवळ्याचे सेवन करावे.आवळ्याचा रस : २०–३० मिली (सुमारे २ चमचे) आवळ्याचा रस सकाळी रिकाम्या पोटी पिणं जास्त फायदेशीर ठरतं. आवळा पावडर : आवळा पावडर १–२ चमचे (३–६ ग्रॅम) कोमट पाण्यात किंवा मधात मिसळून, दिवसातून एकदा किंवा दोनदा पिणं फायदेशीर ठरतं.अशाप्रकारे काही महिन्यांपर्यंत नियमित आवळ्याचे सेवन केल्याने कोलेस्ट्रॉल नियंत्रणात येऊ शकतो.

# बागमांडला जेटीची दुरवस्था

## महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाच्या दुर्लक्षामुळे प्रवाशांचे हाल



**श्रीवर्धनः रामप्रहर वृत्त**

रायगड आणि रत्नागिरी या दोन जिल्ह्यांना जोडणाऱ्या बागमंडला-बाणकोट फेरीबोट सेवेतील बागमंडला जेटीची सध्या दुरवस्था झाली आहे. महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाच्या दुर्लक्षामुळे येथील प्रवाशांना, विशेषतः महिलांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत असून प्रशासनाविरुद्ध संताप व्यक्त केला जात आहे.

**मुख्य समस्याः प्रसाधनगृहांची दयनीय अवस्था**

सावित्री खाडीच्या पात्रातून सुरू असलेली ही फेरीबोट सेवा पर्यटन आणि व्यवसायासाठी अत्यंत महत्त्वाची आहे. मात्र, २०१५ मध्ये मेरीटाईम बोर्डाकडून येथे प्रवाशांसाठी बांधण्यात आलेल्या प्रसाधनगृहाची अवस्था सध्या कचरा डेपोसारखी झाली आहे. निसर्ग चक्रीवादळात नुकसान झाल्यानंतर या प्रसाधनगृहाची दुरुस्ती करण्यात आलेली नाही. स्वच्छतागृहात सगळीकडे प्लास्टिकच्या बाटल्या आणि कचऱ्याचे साम्राज्य पसरले आहे.

**महिला प्रवाशांची मोठी गैरसोय**

या मार्गावरून दररोज मोठ्या संख्येने पर्यटक आणि स्थानिक प्रवास करतात. परंतु, जेटीवर साधी स्वच्छतेची सोय नसल्यामुळे महिलांची मोठी अडचण होत आहे. पर्यटनासाठी येणाऱ्या महिलांना या दुरवस्थेमुळे मनस्ताप सहन करावा लागत असून, प्रशासनाने याकडे त्वरित लक्ष द्यावे, अशी मागणी होत आहे.

**१० टक्के पोर्ट लेव्ही घेऊनही सुविधांचा अभाव**

प्रवाशांकडून आकारण्यात येणाऱ्या तिकीट दरातून १० टक्के निधी 'पोर्ट लेव्ही' म्हणून महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाला दिला जातो. एवढा मोठा निधी जमा होत असतानाही प्रवाशांना किमान मूलभूत सोयी-सुविधा पुरवण्यात बोर्ड अपयशी ठरल्याने प्रवाशांमध्ये तीव्र नाराजी आहे.

**मेरीटाईम बोर्डाचा खुलासा**

या संदर्भात बोर्डाने स्पष्ट केले आहे की, प्रसाधनगृह दुरुस्तीचा प्रस्ताव वरिष्ठ कार्यालयाकडे पाठवण्यात आला आहे. महिन्याभरात दुरुस्तीचे काम हाती घेतले जाईल. तसेच प्रवाशांनी स्वच्छतागृहात कचरा टाकू नये, असे आवाहनही बोर्डाकडून करण्यात आले आहे.

**"व्यवसायानिमित्त आम्हाला नेहमी या फेरीबोटीने प्रवास करावा लागतो. मात्र बागमंडला जेटीवर प्रसाधनगृह सुस्थितीत नसल्याने सर्वांचीच गैरसोय होते. मेरीटाईम बोर्डाने याकडे गांभीर्याने बघून तात्काळ दुरुस्ती करावी."**

**-अकिब पटेल,**
**व्यावसायिक, श्रीवर्धन**

## विद्यार्थ्यांना स्वदेस फाउंडेशनतर्फे शिष्यवृत्ती

**तळा :** रॉनी स्क्रूवाला व झरीना स्क्रूवाला यांच्या स्वदेस फाउंडेशनच्या वतीने रायगड जिल्ह्यामधील माणगाव, तळा,म्हसळा,श्रीवर्धन,महाड ,पोलादपूर व सुधागड तालुक्यामध्ये शिष्यवृत्तीच्या माध्यमातून आत्तापर्यंत १०६१ गरीब व होतकरू विद्यार्थ्यांनी आपले उच्च शिक्षण पूर्ण करून चांगल्या प्रकारची नोकरी मिळवलेली आहे.

शिष्यवृत्ती मिळवण्यासाठी विद्यार्थी हा रायगड जिल्ह्यामधील माणगाव, तळा,म्हसळा,श्रीवर्धन,महाड ,पोलादपूर व सुधागड या तालुक्यातील रहिवासी असावा.कुटुंबाचे वार्षिक आर्थिक उत्पन्न ८.५ लाखाचे आत असावे.इयत्ता १२ वी मध्ये (कला, वाणिज्य, सायन्स) स्वदेस गावातील विद्यार्थ्यांसाठी किमान ६०% गुण आवश्यक आहेत. स्वदेस गावा व्यतिरिक्त विद्यार्थ्यांसाठी किमान ७०% गुण आवश्यक आहेत.


### पनवेल महानगरपालिका, पनवेल ४१० २०६

जाहीर नोटीस

सर्व संबंधितांना या नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये नमूद केलेली मिळकत मौजे- तळोजे मजकूर येथील सर्व्हे नं. ६४ पासून ते मौजे- करवले बुद्रुक येथील सर्व्हे नं. ११६ पर्यंत २४.०० मी. रुंदीच्या तसेच मौजे- तुर्भे येथील सर्व्हे नं. ८३ पासुन ते मौजे- करवले बुद्रुक येथील सर्व्हे नं. ४० पर्यंत २४.०० मी. रुंदीच्या महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम २६ (१) अन्वये दि. ०८/०८/२०२४ तसेच महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम २८(४) अन्वये दि. २५/०६/२०२५ रोजी प्रसिद्ध केलेल्या विकास योजनानुसार २४.०० मी. रुंद नियोजित रस्त्याने बाधित मौजे- करवले बुद्रुक येथील सर्व्हे नं. ९७ मधून प्रस्तावित २४.०० मी. रस्त्याखालील बाधित क्षेत्र व ना-बांधिव (non-Buildable) क्षेत्र पनवेल महानगरपालिका सदर मिळकतीच्या हितसंबंधीतांकडून हस्तांतरणीय विकास हक्काच्या (टी.डी.आर) बदल्यात ताब्यात घेत आहे. सदरील मिळकत निर्वेध व निजाखीम असल्याचा भरवसा सदर मिळकतीच्या हितसंबंधीतांनी पनवेल महानगरपालिकेस दिला आहे.

खालील नमूद मिळकतीवर खालीलप्रमाणे जमीन मालकांशिवाय अन्य कोणाचाही अन्न, वस्त्र, गहाण, दान, बक्षीस, खरेदी, पोटगी, लीज, लीन, चार्ज, इजमेंट अथवा कोणत्याही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास संबंधितांनी प्रस्तुतची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांच्या आत सहाय्यक संचालक, नगररचना, पनवेल महानगरपालिका पनवेल ४१० २०६ यांच्या कार्यालयात कार्यालयीन दिवशी व वेळेत येऊन मुळ कागदपत्रांसह आपली हरकत लेखी स्वरूपात द्यावी. सदर मुदतीत कोणचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास खालील मिळकतीवर कोणाचाही कसलाही हक्क वा हितसंबंध नाही असे समजून किंवा असल्यास संबंधिताने तो जाणूनबुजून सोडून दिला आहे, असे समजून पनवेल महानगरपालिका जमीन ताब्यात घेईल व सदर जमिनीचा मोबदला टी.डी. आर च्या स्वरूपात खालील जमीनमालकास अदा केला जाईल, त्यानंतर येणाऱ्या कोणत्याही तक्रारींची दखल घेतली जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

परिशिष्ट १) मिळकतीचे वर्णनः मौजे करवले बुद्रुक, ता. पनवेल येथील श्री. चेतन विनोद शाह व श्री. आनंद नाथानी यांचे मालकीच्या जमीन मिळकतीमधील रस्त्याने बाधित व ना-बांधिव (non-Buildable) क्षेत्र पुढीलप्रमाणे :-

१) मौजे-करवले बुद्रुक, सर्व्हे नं. ९७/० रस्त्याने बाधित क्षेत्र व ना-बांधिव (non-Buildable) क्षेत्र - १०००.०० चौ. मी

त्यास मोजणी नकाशानुसार चतुःसीमा खालीलप्रमाणे -

पुर्वेस : ला.स.नं. ११९
पश्चिमेस : ला.स.नं. ९६, ९८
दक्षिणेस : ला.स.नं. ९५
उत्तरेस : ला.स.नं. ११७

टिप :- उक्त जागा दर्शविणारा नकाशा पाहणीसाठी नगररचना विभागात ठेवण्यात आला आहे.

जा क्र. - पमपा/नरवि/टिडीआर/२६-२६/२८३ /२०२६
दिनांक : २७/०३/२०२६

**सही/-**
**सहाय्यक संचालक नगररचना**
**पनवेल महानगरपालिका,**

टिप - सदरची जाहीर नोटीस पनवेल महानगरपालिकेच्या www. panvelcorporation.com या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात आली आहे.


## मिनीबसमध्ये बिघाड; चालकाच्या प्रसंगावधानाने अनर्थ टळला

**नेरळ : प्रतिनिधी**

कर्जत येथून माथेरानसाठी बुधवारी (१ एप्रिल) सकाळी निघालेली मिनीबस घाटरस्त्यात बंद पडल्याने काही काळ थरारक परिस्थिती निर्माण झाली. प्रवासी घेऊन जाणाऱ्या या मिनीबसचा गिअर बॉक्स निकामी झाल्याने चालकाला गाडी रस्त्याच्या कडेला थांबवावी लागली. मात्र, चालकाने प्रसंगावधान राखल्याने मोठा अनर्थ टळला असून प्रवाशांचा जीव वाचला आहे. विशेष म्हणजे, ३० आसनी असलेल्या या मिनीबसमध्ये



तब्बल ४५ प्रवासी प्रवास करत होते, त्यामुळे हा प्रकार अधिक गंभीर मानला जात आहे.

कर्जत एसटी आगारातून कर्जत-नेरळ-माथेरान अशी मिनीबस बुधवारी सकाळी नेहमीप्रमाणे माथेरानकडे रवाना झाली होती. सकाळी ०८:१५ वाजता कर्जत येथून निघालेल्या या ३० आसनी मिनीबसमध्ये ४५ प्रवासी प्रवास करत होते.जुंमापट्टी येथील प्रसिद्ध आणि अवघड वळणाचा चढाव पार केल्यानंतर गाडीचे गिअर पडत नसल्याचे चालकाच्या लक्षात आले. घाटातील तीव्र चढ, वळणावळणाचा रस्ता आणि गाडीत मोठ्या प्रमाणावर असलेले प्रवासी यामुळे काही क्षणांसाठी तणावाचे वातावरण निर्माण झाले.

परिस्थितीची गंभीरता ओळखून चालकाने तातडीने प्रसंगावधान राखत मिनीबस रस्त्याच्या कडेला सुरक्षित थांबवली. त्यानंतर प्रवाशांना तात्काळ खाली उतरविण्यात आले. अचानक गाडीत बिघाड झाल्याचे समजताच प्रवाशांमध्ये काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. सुदैवाने चालकाच्या सतर्कतेमुळे कोणतीही दुर्घटना घडली नाही.

या मार्गावरील मिनीबस सेवेबाबत दोन वर्षांपूर्वी मंत्री उदय सामंत यांनी दोन नवीन बसेस उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले होते.


### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळवीणेत येते की मौजे लोणिवली, तालुका - पनवेल, जिल्हा - रायगड, येथील खाली वर्णन करणेत आलेली शेतजमीन विद्यमान कब्जेदार यांचेकडून आमचे अशिलानी कायम खरेदी घेणेचा व्यवहार ठरविला आहे, महसूल दप्तरी असलेले सदर शेतजमीनीचे वर्णन खालिलप्रमाणे :

**शेतजमीनीचे वर्णन**

मौजे लोणिवली, तहसिलदार पनवेल जिल्हा रायगड येथील मे. दुय्यम निबंधक पनवेल यांचे अधीकार क्षेत्रातील

| गट क्रमांक व उपविभाग | भोगवटादार वर्ग | क्षेत्र | | | आकार रू.पै. |
|---|---|---|---|---|---|
| | | लावणी लायक हे.आर.प्रती | पोटखराबा हे.आर.प्रती | एकुण क्षेत्र हे.आर.प्रती | |
| १०१/३ | २ | ०-१३-४० | ०-००-०० | ०-१३-४० | २.६९ |

वरील शेतजमीन / मिळकत या बाबत अन्य कोणाही व्यक्तीचा गहाण, दान, बक्षीस, साठेकरार, फरोक्त, पोटगी, वारसा वा तत्सम कोणतेही प्रकारचे दस्ताने कोणतेही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथम दर्शनी पुराव्या सहीत सदर नोटीस प्रसिध्द झालेपासुन २१ दिवसाचे आत पोहचतील अश्या खाली सही करणार खरेदीदाराचे वकील यांचेकडे रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. वरील मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे असे समजणेत येवुन सदर खरेदी व्यवहार विद्यमान मालक यांच्या बरोबर पूर्ण केला जाईल व मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : ०१/०४/२०२६

**सही/-**
**ॲड. स्वप्निल व्यं. जाधव**
बी.ए., एल. एल. बी.

**कार्यालयीन पत्ता** - शॉप नं. १५४, पनवेल महानगरपालिका शॉपिंग कॉम्प्लेक्स, दत्त झेरॉक्सच्यावर, ता. पनवेल, जिल्हा रायगड ४१०२०६
संपर्क : ८८८८२७१७५९


## कोमसाप श्रीवर्धन शाखेचा वर्धापनदिन 'वसंतोत्सव'ने साजरा

**श्रीवर्धनः रामप्रहर वृत्त**

श्रीवर्धन येथील कोकण मराठी साहित्य परिषदेचा २२ वा वर्धापनदिन नुकताच एका आगळ्यावेगळ्या पद्धतीने साजरा करण्यात आला. ज्येष्ठ नागरिक संघ, पेन्शनर असोसिएशन श्रीवर्धन आणि कोकण मराठी साहित्य परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने 'वसंतोत्सव २०२६' या स्नेहसंमेलनाचे आयोजन करण्यात आले होते.



श्रीवर्धन येथील श्री दत्त मंदिर सभागृहात रविवारी सायंकाळी हा सोहळांबोधित करताना रायगड जिल्हा केंद्रीय प्रतिनिधी गणेश कोळी यांनी सांगितले की, "२००४ मध्ये स्थापन झालेल्या या शाखेचे आज ११७ सभासद आहेत. गेल्या २२ वर्षात आंतरमहाविद्यालयीन स्पर्धा, चर्चासत्रे, लेखक आपल्या दारी, दिवाळी पहाट आणि साहित्य दरबार यांसारखे अनेक स्तुत्य उपक्रम राबवले गेले आहेत."

या सोहळ्यात ज्येष्ठ नागरिकांनी कविता, गाणी, विनोदी किस्से, नृत्य आणि विविध गमतीशीर खेळ खेळत आपल्या सुप्त कलागुणांचे सादरीकरण केले.

या कार्यक्रमाला ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष नरेश पुलेकर, पेन्शनर असोसिएशन संघटनेचे अध्यक्ष चंद्रकांत केळस्कर, उद्योजक राजेंद्र धारिया आणि कोकण मराठी साहित्य परिषद श्रीवर्धन शाखेचे अध्यक्ष व कार्यकारी मंडळाचे सदस्य उपस्थित होते.

## खोपोलीसाठी झटणाऱ्या साबळेंच्या तीन पिढ्या यशवंतशेठ किर्तिवंत व्हा!

खोपोलीच्या सर्वांगीण विकासात मुलाचा वाटा उचलणारे उद्योजक सोबत सामाजिक शैक्षणिक सांस्कृतिक आणि धार्मिक क्षेत्रात सक्रिय नेतृत्व करणारे यशवंत शेठ लक्ष्मण साबळे आदर्श व्यक्तिमत्व सुपरीजित आहेत त्यांच्या कार्याचा व्याप आणि समाजासाठी ची निस्वार्थी बांधिलकी पाहता ते खऱ्या अर्थाने लोकमत लोकनेते ठरतात हनुमान जयंती सारख्या पवित्र आणि प्रेरणादायी दिवशी त्यांचा वाढदिवस असणे हा एक दूरदर्शन शर्करा योगच म्हणावा लागेल प्रभू श्री हनुमान चा प्रमाणित मी स्वार्थी सेवा प्रामाणिक आणि ध्येयवेढे या गुणांचा प्रत्येक त्यांच्या कार्यातून सातत्याने येतो समाजातील प्रत्येक घटकाला सोबत घेऊन पारदर्शक आणि स्वच्छ वारंवारचा आग्रह जाणारे तसेच भ्रष्टाचार विरुद्ध ठाम भूमिका घेणारे असे त्यांचे व्यक्तिमत्व विशेष उठून दिसते यशवंत शेठ साबळे यांना समाजसेवेचा वारसा लाभला तो त्यांचे वडील वैकुंठ अशी लक्ष्मण शेठ सावळे यांच्याकडून स्वतःचा व्यवसाय सांभाळत असताना त्यांनी सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात सक्रिय सहभाग घेत खोपोली शहराच्या जडणघडीत मोठे योगदान दिले नगराध्यक्ष पदावर कार्यरत असताना त्यांनी घेतलेले दूरदृष्टीचे निर्णय आजही शहराच्या विकासात मार्गदर्शक ठरत आहेत त्यांच्या कार्यामुळे खोपोलीचे राजकारण अधिक सक्षम आणि दिशादर्शक बनले हा समृद्ध वारसा श्री यशवंत शेठ साबळे यांनी समर्थपणे पुढे नेला त्यांनी केवळ राजकीय क्षेत्रातच नव्हे तर कौतुक कुटुंबातील पुढील पिढीला एक सक्षम नेतृत्व दिले आपले बंधू तुकाराम शेठ साबळे यांना सलग तीन वेळा नगरपालिकेच्या निवडणुकीत विजयी करण्यासाठी त्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली तसेच आपल्या चिरंजीव विक्रम साबळे यांना अल्पावधीत प्रचंड मताधिक्याने निवडून आणून उपक्रम आदर्श पदावर भारतीय जनता पार्टीच्या वरचे आदेशाने विरोजन म्हणून करण्यात त्यांचा मोठा वाटा आहे यावरून त्यांच्या नेतृत्व कोणाची आणि संघटन कौशल्याची प्रचिती येते सहकार क्षेत्रातील ही श्री यशवंत शेठ सावळे यांनी भरीव कामगिरी केली आहे काशी नगरी पतपेढीच्या माध्यमातून त्यांनी अनेक गोरगरीब आणि गरजू नागरिकांना उद्योग व्यवसायासाठी आर्थिक पाठबळ उपलब्ध करून दिले त्यांच्या या कार्यामुळे अनेक कुटुंबांना आर्थिक स्थैर्य मिळाले असून सावला मिळण्याचा मार्ग खुला झाला आहे समाजातील हितासाठी उन्नतीसाठी त्यांनी घेतलेले उपक्रम अत्यंत स्तुत आणि सामाजिक बांधिलकी प्रामाणिक नेतृत्व दूरदृष्टी आणि सर्वसामान्य विकासाची भूमिका या सर्व गुणांचा संगम म्हणजे यशवंत चावले माजी नगराध्यक्ष स्वर्गीय यशवंत शेठ संपले खोपोलीच्या सर्वांगीण सामाजिक शैक्षणिक आणि राजकीय पटलावर दीपस्तंभ आहे खोपोलीकर जनता नगरसेवक असावा असा तर लक्ष्मण शेठ साबळे यांच्यासारखा असा नामांक करतात त्यांच्या पावलावर पाऊल ठेवून पिताश्रीच्या प्रतिमे सोबत जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठी यशवंत शेठ झटत असतात यशस्वी यशस्वी उद्योजक आदर्श राजकारणी गोरगरिबांसाठी दानशूर शैक्षणिक क्षेत्रातील वर्षाचा झाला वाचा फोडणारे मजबूत देण्यात अशी स्वभाव असणारे यशवंत शेठ लक्ष्मण शेठ सावले हे आपलं प्रकट दिन साजरा करत आहेत उत्तम आरोग्य संपदा लावल्याने इतरांनाही उत्तम आरोग्य सुविधा उपलब्ध व्हावी यासाठी सदैव तत्पर असतात आपल्या ज्ञानाचा व पुंजीचा हिस्सा सर्वांसाठी फुले ठेवणाऱ्या एशियन शीट यांनी दिन दुबळ्या घोरघरी जनता सामाजिक शैक्षणिक क्षेत्रात तसे पत्रकार यांनाही मदत करण्यास उत्सुक असतात यशवंत शेठ साबळे यांनी भारतीय जनता पार्टीत प्रवेश केल्यानंतर अल्पावधीतच खोपोली नगरपालिकेतील सत्तेत्सव भागीदार झाले खोपोलीत नगज्ञ असणाऱ्या भाजपाचा सुवर्णकाळ सुरू झाला आहे २०२५ च्या विधानसभा निवडणुकीत खोपोलीत मताधिक्य मिळाले आमदार महेंद्र थोरवे हे विधानसभेत निवडून आणण्यात यशवंत शेठ यांचा सिंहाचा वाटा आहे त्यांच्या पुढील आयुष्यात उत्तम आरोग्य दीर्घायुष्य आणि अधिक यश लाभो ही सदिच्छा



**-हभप काशिनाथ महाराज पारठे**
**भाजपा आध्यात्मिक समन्वय आघाडी**
**रायगड जिल्हा संयोजक**


### महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

मुदतवाढ सूचना

**ई निविदा सूचना क्र. ८६/२०२५-२०२६ (मुंबई) करीता**

दिनांक १६/०३/२०२६ रोजी दैनिक नवाकाळ, मुंबई, दैनिक फ्रिप्रेस जरनल, मुंबई, दैनिक हिंदूस्तान टाईम्स, मुंबई,दैनिक नवभारत, मुंबई, दैनिक खबरें आजतक, मुंबई, दैनिक जागरुक टाईम्स, मुंबई, दैनिक रामप्रहर, रायगड या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध झालेल्या वरील ई निविदा सूचनेतील खालील कामांकरीता ई निविदा उपलब्धता, कंत्राटदारांचे प्रश्न, कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण /महामंडळाचा खुलासा https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्धते बाबत मुदतवाढ सूचना देण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १. | तळोजा औद्योगिक क्षेत्र ... नावडे येथील लेव्हल क्रॉसिंग क्र. १२-ए वरील रोड ओव्हर ब्रिजच्या (आरओबी) दुरुस्तीची कामे करणे. | ₹ १७,४०,४६,१७५.०० |
| २. | बोरीवली औद्योगिक क्षेत्र... नव्याने तयार करण्यात आलेल्या भूखंडांसाठी सिमेंट काँक्रेटचा रस्ता, आर.सी.सी. गटार व नाला बांधणेबाबत. | ₹ ९,४३,३५,२७३.०० |
| ३. | तळोजा औद्योगिक क्षेत्रातील रस्त्यांची देखभाल व दुरुस्ती... पावसाळ्यापूर्वी व पावसाळ्यानंतर नाले व रस्त्याच्या कडील गटारांची साफसफाई तसेच इंजिनिअरिंग झोनमधील बांधकाम केलेल्या गटारांची यांत्रिक पद्धतीने साफसफाई व अनुषंगिक कामे करणे. | ₹ २,३१,१८,२४२.०० |
| ४. | रोहा औद्योगिक क्षेत्रातील सामायिक सांडपाणी केंद्रा मधील वापरात नसलेल्या सिमेंट कॉंक्रेटच्या यु ए एसबी टाकीची दुरुस्ती व मजबुतीकरण करून सांडपाणी साठविण्याकरिता उपयोगात आणणे तसेच कंपाऊंड भिंतीचे बांधकाम करणे. | ₹ ३,६२,४५,०१०.०० |

उपरोक्त अ.क्र. १ व २ वरील कामांबाबत निविदा प्रपत्र दिनांक ०२/०४/२०२६ ते २७/०४/२०२६ पर्यंत व अ.क्र. ३ व ४ वरील कामांबाबत निविदा प्रपत्र ०२/०४/२०२६ ते १६/०४/२०२६ पर्यंत https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

इच्छुकांनी उपरोक्त अ.क्र. १ व २ वरील कामांबाबत दिनांक ०९/०४/२०२६ पूर्वी व अ.क्र. ३ व ४ वरील कामांबाबत दिनांक ०६/०४/२०२६ पूर्वी त्यांचे प्रश्न वर नमुद संकेत स्थळावर नोंदवावेत. कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण /महामंडळाचा खुलासा अ.क्र. १ व २ वरील कामांबाबत दिनांक १४/०४/२०२६ पासून व अ.क्र. ३ व ४ वरील कामांबाबत दिनांक ०८/०४/२०२६ पासून वर नमुद संकेत स्थळावर उपलब्ध होईल.

ज्या निविदाधारकांनी यापूर्वी आपली निविदा भरली असेल अथवा अपलोड केली असेल, त्यांनी निविदेमध्ये बदल करुन किंवा बदल न करता सदर निविदा पुन्हा भरणे आवश्यक आहे, याची कृपया नोंद घ्यावी, अशा कंत्राटदारांनी शुद्धिपत्रकानंतर जर निविदा पुन्हा भरली नाही अथवा अपलोड केली नाही तर त्यांचा देकार सदर स्पर्धात्मक निविदेतून आपोआप बाद होईल.

सदर निविदा सूचनेत इतर कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

# नवी मुंबई मनपाची ८७६ कोटींची करवसुली

## मालमत्ता करात विक्रमी भरारी



**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई महानगरपालिकेने चालू आर्थिक वर्षात मालमत्ता कर वसुलीत नवा उच्चांक प्रस्थापित केला असून, ३१ मार्च रोजी मध्यरात्रीपर्यंत तब्बल ८७६ कोटी रुपयांची वसुली करण्यात आली आहे. गतवर्षीच्या तुलनेत ही वसुली सुमारे १०५ कोटी रुपयांनी अधिक असल्याने महापालिकेच्या महसुलात यंदा लक्षणीय वाढ झाल्याचे स्पष्ट झाले आहे.

महापालिकेने यंदा मालमत्ता कर वसुलीसाठी महत्त्वाकांक्षी उद्दिष्ट ठेवले होते. त्यानुसार वर्षभर विविध उपाययोजना राबविण्यात आल्या. विशेषतः थकीत कर वसुलीसाठी राबविण्यात आलेल्या 'अभय योजने'ला नागरिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या योजनेअंतर्गत विलंब शास्तीवर ५० टक्के सवलत देण्यात आल्याने थकबाकीदारांनी मोठ्या प्रमाणावर पुढे येत कर भरण्यास प्राधान्य दिले.

अंतिम टप्प्यात वसुलीत मोठी उसळी दिसून आली. विशेष म्हणजे, शेवटच्या दोन दिवसांतच सुमारे ९० कोटी रुपयांचा मालमत्ता कर भरला गेल्याने एकूण आकड्यात झपाट्याने वाढ झाली. कर भरण्याच्या अंतिम मुदतीपूर्वी नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद दिल्याचे यावरून स्पष्ट होते. निवडणूक वर्ष असतानाही नवी मुंबई महापालिकेने मालमत्ता कर वसुलीत उल्लेखनीय कामगिरी करत राज्यातील इतर महापालिकांसमोर आदर्श निर्माण केला आहे.

प्रशासनाने कर भरण्याची प्रक्रिया सुलभ करण्यासाठी ऑनलाइन तसेच ऑफलाइन सुविधा उपलब्ध करून दिल्या होत्या. अधिकृत संकेतस्थळ, व्हॉट्सअॅप चॅटबॉट तसेच शहरातील विविध कर संकलन केंद्रांवर नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर कर भरला. अंतिम दिवशी कर संकलन केंद्रांची वेळ मध्यरात्रीपर्यंत वाढविण्यात आली होती, तर ऑनलाइन सेवा २४ तास सुरू ठेवण्यात आली होती.

### आगामी विकासकामांना मिळणार गती

दरम्यान, गतवर्षी (२०२४-२५) ३१ मार्चअखेर ८२६ कोटी रुपयांची वसुली झाली होती. त्या तुलनेत यंदाची ८७६ कोटी रुपयांची वसुली ही आतापर्यंतची सर्वाधिक ठरली आहे. अभय योजनेमुळे महसुलात झालेली ही भर महापालिकेसाठी आर्थिकदृष्ट्या महत्त्वाची ठरणार असून, आगामी विकासकामांना गती देण्यासाठी याचा मोठा हातभार लागणार आहे. महापालिकेने यंदा मालमत्ता कर वसुलीसाठी महत्त्वाकांक्षी उद्दिष्ट ठेवले होते.

# उरण महाविद्यालयात बँकिंग विषयावर प्रमाणपत्र अभ्यासक्रम



**उरण : रामप्रहर वृत्त**

कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य व कला महाविद्यालयातील अकाउंटिंग अँड फायनान्स विभाग व करियर कट्टा विभागाच्या वतीने महाविद्यालयात बँकिंग, वित्त आणि विमा क्षेत्र (सर्टिफिकेट प्रोग्राम इन बँकिंग, फायनान्स अँड इन्शुरन्स) या विषयावर चाळीस दिवसांचा पूर्णवेळ प्रमाणपत्र कोर्स आयोजित केला गेला.

सुब्रमण्यम सर, मंदार सर व अमोल सर यांनी विद्यार्थ्यांना ४० दिवस प्रशिक्षण दिले. या कोर्समध्ये विद्यार्थ्यांनी बँकिंग, विमा व वित्त या क्षेत्राविषयी नॉलेज प्राप्त केले. या प्रमाणपत्र अभ्यासक्रम समारोपीय कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वाल्मीक गर्जे हे होते. त्यांनी कोर्स पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व या कोर्समध्ये संवाद कौशल्य, आर्थिक साक्षरता, विमा चे महत्व त्याचबरोबर, सार्वजनिक वागणुकीचे कौशल्य व समूह चर्चा इत्यादी स्किल विद्यार्थ्यांना या कोर्स मधून मिळाले असल्याचे सांगितले. तर आयक्यूएसी समन्वयक डॉ. ए. आर. चव्हाण यांनी विद्यार्थ्यांनी ध्येय निश्चित करून मोठ्या व्यवसायाची स्वप्न पाहिली पाहिजे व सातत्याने स्वतःला प्रेरित करून यश प्राप्त केले पाहिजे असे सांगितले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. पूजा गुप्ता, प्रा. दिपू यादव यांनी मेहनत घेतली. समारोपीय कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले.

# जास्त परतावा देण्याचे आमिष दाखवून फसवणूक

**पनवेल :** शेअर्स ट्रेंडिंगमध्ये केलेल्या गुंतवणूक वर जास्त परतावा देण्याचे आमिष दाखवून एक कोटी पन्नास हजार रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी तीन अनोळखी व्यक्तीविरोधात सायबर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

राकेश कुर्मी हे नवीन पनवेल, सेक्टर सहा येथे राहत असून त्यांनी टेलिग्राममध्ये जाहिरात लिंक पाहिली. त्यांनी लिंक वर क्लिक केले असता ते व्हॉट्सअॅप ग्रुपला जॉईन झाले. यावेळी ग्रुप वर नफ्याबाबत माहिती दिली जात होती. राकेश यांनी पन्नास हजार रुपये डिपॉझिट केले आणि शेअर्समध्ये पैसे गुंतवणूक केल्याने त्यांना नफा होत होता. त्यामुळे त्यांनी अधिक पैशांचे गुंतवणूक केली आणि शेअर्स विकत घेतले. त्यांनी एक कोटी पन्नास हजार रुपये भरल्यानंतर वेगवेगळे आयपीओ देण्यात आले आणि नवीन आयपीओ विकत घेतल्यानंतरच त्यांच्या खात्यात रक्कम देण्यात येत होती. त्यांची रक्कम अगोदर घेतलेला आयपीओमध्ये गुंतून राहिल्याने त्यांनी ती मिळण्यासाठी विनंती केली. आणखी ९० लाख रुपये भरण्यास सांगितले, मात्र त्यांच्याकडे पैसे नसल्याने त्यांनी ते भरण्यास नकार दिला आणि फसवणूक झाल्याचे त्यांच्या लक्षात आले.

# नवी मुंबई परिवहन उपक्रमाचा ६५२ कोटींचा अर्थसंकल्प

## सीएनजी-इलेक्ट्रिकच्या बसेसमध्ये वाढ



**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई महानगरपालिका परिवहन उपक्रमाचा २०२६-२७ वर्षासाठी ६५२ कोटी रुपयांचा अर्थसंकल्प सोमवारी महासभेत सादर करण्यात आला. पर्यावरणपूरक बस ताफा वाढवणे, चार्जिंग सुविधा उभारणे आणि नवीन बसमार्ग सुरू करण्यावर भर देण्यात आला आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या तरतुदीनुसार 'अर्थसंकल्प ब' महासभेत मांडण्यात आला.

सन २०२५-२६ च्या सुधारित अंदाजानुसार ४६७.२५ कोटी रुपयांच्या उत्पन्नातून ४६७.१५ कोटी खर्च वजा जाता सुमारे ९.५५ लाख रुपयांची शिल्लक राहणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले. तर २०२६-२७ साठी आरंभीची ९.५५ लाख शिल्लक धरून एकूण ६५२ कोटींचे उत्पन्न अपेक्षित असून ६५१.९० कोटी खर्चानंतर वर्षअखेरीस सुमारे ९.३५ लाख शिल्लक राहण्याचा अंदाज आहे.

पर्यावरणपूरक वाहतुकीवर विशेष भर देत जुन्या डिझेल बस टप्प्याटप्प्याने बाद करून सध्या १५० सीएनजी बसचा ताफा कार्यरत असून, आगामी वर्षात आणखी १०० सीएनजी अथवा इलेक्ट्रिक बस खरेदी करण्याचे नियोजन आहे. केंद्र शासनाच्या 'पीएम ई-बस सेवा' योजनेअंतर्गत १०० इलेक्ट्रिक बससाठी प्रस्ताव पाठविण्यात आला आहे.

इलेक्ट्रिक वाहनांच्या वाढत्या वापराच्या पार्श्वभूमीवर शहरात सार्वजनिक वाहनांसाठी पीपीपी तत्वावर १० ठिकाणी चार्जिंग सुविधा उभारण्यात येणार आहेत. तसेच परिवहन उपक्रमाच्या आगार व बस टर्मिनस येथे सौरऊर्जा प्रकल्प राबवून वीज खर्चात बचत करण्याचे नियोजन आहे. उत्पन्न वाढीसाठी बस टर्मिनसचे व्यावसायिक विकासावरही भर देण्यात आला आहे. वाशी सेक्टर ९ आणि सेक्टर १२ येथील बस टर्मिनस वाणिज्य संकुल भाडेतत्वावर देऊन वाहतूकबाह्य उत्पन्न वाढवण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

याशिवाय, नवीन विमानतळ आणि वाढती प्रवासी संख्या लक्षात घेऊन मुंबई महानगर क्षेत्रात बससेवेचा विस्तार केला जाणार असून, अधिक उत्पन्न देणारे नवीन बसमार्ग सुरू करण्याचे नियोजन आहे. वाहतूक व्यवस्थापन अधिक सक्षम करण्यासाठी अद्ययावत 'आयटीएमएस' प्रणालीचा वापर करून बससेवा अधिक वेळेवर आणि कार्यक्षम करण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे.

**सवलती कायम**

परिवहन उपक्रमाच्या अर्थसंकल्पात सामाजिक बांधिलकीचा भाग म्हणून विद्यार्थी, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांना बस प्रवासात विविध सवलती कायम ठेवण्यात आल्या आहेत. सार्वजनिक वाहतूक अधिक आकर्षक करण्यासाठी या सवलती महत्त्वाच्या मानल्या जात आहेत.

# गजल हा कवितेचा एक प्रभावी प्रकार -दिलीप पांढरपट्टे

## ज्येष्ठ गजलकार ए. के. शेख यांचा सहस्त्रचंद्रदर्शन सोहळा




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

गजल हा कवितेचाच एक प्रभावी प्रकार असून, त्यातील वृत्तबद्धतेमुळे गजलला गेयता प्राप्त होते, असे प्रतिपादन गजलकार दिलीप पांढरपट्टे यांनी येथे केले. पनवेलमधील ज्येष्ठ गजलकार ए. के. शेख यांच्या ८०व्या वाढदिवसानिमित्त आयोजित सहस्त्रचंद्रदर्शन सोहळ्यात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

दिलीप पांढरपट्टे पुढे म्हणाले की, ज्याप्रमाणे संत तुकाराम महाराजांचे अभंग त्यातील गेयतेमुळे भाषणांमध्ये प्रमाण म्हणून वापरले जातात, त्याचप्रमाणे गजलमधील शेरही कित्येक जण आपल्या भाषणांमध्ये प्रमाण म्हणून वापरतात. इतकी सहजता त्या शेरांमध्ये असते. रविवारी, २९ मार्च रोजी श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ, मार्केट यार्ड, पनवेल येथे ज्येष्ठ गजलकार ए. के. शेख यांचा सहस्त्रचंद्रदर्शन सोहळा झाला. यावेळी 'गजल कळ्याफुलांची' हा प्रातिनिधिक गजलसंग्रह, तसेच डॉ. सुभाष कटकदौंड यांच्या 'पण थांबणे जमलेच नाही' या गजलसंग्रहाचेही प्रकाशन करण्यात आले.

सोहळयाप्रसंगी व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून पनवेलचे माजी नगराध्यक्ष सईद मुल्ला, सत्कारमूर्ती ज्येष्ठ गजलकार ए. के. शेख, सहस्त्रचंद्रदर्शन सोहळा आयोजन समिती प्रमुख रोहिदास पोटे, प्रातिनिधिक गजलसंग्रहाचे संपादक डॉ. सुभाष कटकदौंड, दिवाकर वैशंपायन, अॅड. माधुरी थळकर, गणेश म्हात्रे, संदीप बोडके, प्रकाशक प्रभाकर पवार आदी उपस्थित होते.

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष सईद मुल्ला यांनी ए. के. शेख यांच्या मृदू स्वभावेचे वर्णन करताना, पनवेलमधील धार्मिक दंगलीच्या वेळी त्या थांबवण्यासाठी त्यांनी एक कवी म्हणून दिलेल्या योगदानाचा गौरवाने उल्लेख केला. यावेळी ए. के. शेख यांचा त्यांच्या शिष्य परिवारातर्फे मानपत्र देऊन सपत्नीक सन्मान करण्यात आला.

**वैशिष्ट्यपूर्ण प्रातिनिधिक गजलसंग्रह**

सहस्त्रचंद्रदर्शन सोहळ्यानिमित्त प्रकाशित 'गजल कळ्याफुलांची' या प्रातिनिधिक गजलसंग्रहामध्ये एकूण ११६ गजल असून, त्यांचे वैशिष्ट्य म्हणजे यातील प्रत्येक गजल वेगवेगळ्या वृत्तात आहे. त्यामुळे संपूर्ण संग्रहात ११६ वृत्त हाताळण्यात आली असून, हा संग्रह वैशिष्ट्यपूर्ण व ऐतिहासिक झाला आहे.

**राज्यभरातून गजलकारांची उपस्थिती**

ए. के. शेख यांच्या सहस्त्रचंद्रदर्शन सोहळ्यासाठी राज्यभरातून गजलकारांनी उपस्थिती लावली. त्यामध्ये यवतमाळ, नागपूर, जळगाव, नाशिक, पुणे, सोलापूर, सांगली, सातारा, रत्नागिरी आदी जिल्ह्यांतून, तसेच गुजरात गांधीनगर येथून गजलकार उपस्थित होते. दुपारनंतर दुसऱ्या सत्रात झालेल्या गजल मुशायऱ्यामध्ये या गजलकारांनी आपल्या गजल पेश केल्या.

# कोकण विभागीय आयुक्तपदी अग्रवाल



**नवी मुंबई : बातमीदार**

प्रशासकीय क्षेत्रातील आपल्या धडाकेबाज कार्यशैलीसाठी ओळखल्या जाणाऱ्या ज्येष्ठ सनदी अधिकारी रुबल अग्रवाल यांनी सोमवार, ३० मार्च २०२६ रोजी कोकण विभागीय आयुक्त पदाची सूत्रे स्वीकारली आहेत. त्यांनी प्रभारी विभागीय आयुक्त सिद्धराम सालीमठ यांच्याकडून या पदाचा कार्यभार अधिकृतपणे स्वीकारला.

२००८ च्या बॅचच्या आयएएस (अधिकारी असलेल्या रुबल अग्रवाल यांनी आपल्या कारकिर्दीत विविध महत्त्वाच्या पदांवर काम करून आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवला आहे. यापूर्वी त्यांनी सोलापूर येथे सहायक जिल्हाधिकारी म्हणून आपल्या सेवेला सुरुवात केली होती. त्यानंतर अहमदनगर जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आणि अहमदनगर तसेच जळगाव येथे जिल्हाधिकारी म्हणून त्यांनी यशस्वी कामकाज पाहिले आहे.

रुबल अग्रवाल या शिर्डीच्या श्री साईबाबा संस्थान ट्रस्टच्या पहिल्या महिला मुख्य कार्यकारी अधिकारी होत्या. त्यांच्या काळात साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाचे नियोजन अत्यंत भव्य आणि शिस्तबद्ध पद्धतीने करण्यात आले होते. त्या पुणे महापालिकेत अतिरिक्त महापालिका आयुक्त म्हणून कार्यरत असताना त्यांनी कोविड-२०१९च्या भीषण संकटाचे व्यवस्थापन अत्यंत प्रभावीपणे केले. यापूर्वी त्यांनी एकात्मिक बाल विकास सेवा योजनेच्या आयुक्त म्हणून राज्यातील एक लाख १० हजार अंगणवाड्यांचे जाळे सक्षमपणे हाताळले आहे. कोकण विभागीय आयुक्त पदावर येण्यापूर्वी त्या महा मुंबई मेट्रो ऑपरेशन कॉर्पोरेशन लिमिटेडच्या व्यवस्थापकीय संचालक म्हणून कार्यरत होत्या.

रुबल अग्रवाल यांच्या उत्कृष्ट प्रशासकीय सेवेबद्दल त्यांना आतापर्यंत उत्कृष्ट जिल्हाधिकारी पुरस्कार (महाराष्ट्र शासन, २०१६-१७), महात्मा गांधी शांतता पुरस्कार (जळगावमध्ये कायदा व सुव्यवस्था राखल्याबद्दल), अरुण बोंगीरवार सार्वजनिक सेवा उत्कृष्टता पुरस्कार (पुणे शहरातील कोविड नियंत्रणासाठी), स्मार्ट सिटी डिजिटल पेमेंट आणि ई-गव्हर्नन्स पुरस्कार अशा अनेक प्रतिष्ठित महत्त्वाच्या पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे.

# ग्रामीण भागातही 'लव्ह मॅरेज'ची वाढती लाट



जिल्ह्यासह ग्रामीण भागात एक मोठे सामाजिक परिवर्तन वेगाने घडताना दिसत आहे. ते म्हणजे लव्ह मॅरेजची वाढती संस्कृती. अर्थातच प्रेम विवाहचे वाढती संस्कृती. ज्या समाजात एकेकाळी प्रेमविवाह हा गुन्हा किंवा कुटुंबावरील कलंक मानला जात होता, त्याच समाजात आज तो हळूहळू स्वीकारला जाऊ लागला आहे. बदलाची गती इतकी वेगवान आहे की, अनेक गावांमध्ये गेल्या पाच वर्षांत अशा विवाहांचे प्रमाण दुपटीहून अधिक वाढल्याचे स्थानिक जाणकार, जुने बुजुर्ग सांगतात.

या बदलामागे अनेक कारणे दिसून येतात. ग्रामीण भागातील युवक युवतींचे शहरांकडे शिक्षणासाठी स्थलांतर, कॉलेजमधील मोकळे वातावरण, तसेच मोबाईल आणि सोशल मीडियामुळे वाढलेली संवादाची सुलभता, या सगळ्यांनी ओळखींचे जाळे विस्तारले आहे. विशेषतः मोबाईल हा या परिवर्तनाचा टर्निंग पॉइंट ठरला आहे. परिणामी, प्रेमविवाह केवळ दोन व्यक्तींचा निर्णय न राहता, ग्रामीण समाजात समता आणि स्वातंत्र्याच्या दिशेने उचललेले एक महत्त्वाचे पाऊल ठरत आहे. विविध जाती-धर्मातील तरुण एकत्र येत असल्याने सामाजिक भिंती हळूहळू कमी होत असल्याचे चित्र दिसत आहे, मात्र या बदलासोबत काही गंभीर दुष्परिणामही पुढे येत आहेत. जितके फायदे तितके नुकसानहि दिसत आहेत.

मोबाईलमुळे चुकीच्या नात्यांमध्ये अडकण्याचे प्रकार वाढले आहेत. अल्पवयीन मुला-मुलींचे पळून जाणे, तडकाफडकी घेतलेले विवाहाचे निर्णय, आर्थिक स्थैर्य नसताना घेतलेले निर्णय यामुळे अनेक कुटुंबांमध्ये तणाव निर्माण होत आहे. काही वेळा हे प्रकरण कोर्ट-पोलिसांपर्यंत पोहोचते, तर अनेक ठिकाणी कुटुंबांतील नाती कायमची तुटण्याची वेळ येते. काही भागांत जातीय तणाव निर्माण झाल्याची उदाहरणेही समोर येत आहेत.

या पार्श्वभूमीवर, प्रेमविवाह हा केवळ विवाहपद्धतीतील बदल नसून ग्रामीण समाजाच्या मानसिकतेत होत असलेल्या मोठ्या परिवर्तनाचा संकेत मानला जात आहे. स्वातंत्र्य, समानता आणि स्वतःच्या आयुष्याचे निर्णय घेण्याची क्षमता या मूल्यांकडे ग्रामीण पिढी झुकत असल्याचे स्पष्ट दिसते. एकूणच, ग्रामीण भागातील वाढती लव्ह मॅरेज संस्कृती ही बदलत्या काळाची निशाणी असली, तरी या बदलाला समजून घेत संतुलित दृष्टीकोन ठेवणे आवश्यक आहे. संतुलित दृष्टीकोण ठेवल्यास अनेक दुष्परिणाम पासून वाचता येते. त्यासाठी सर्वांनी संतुलित दृष्टीकोण ठेवणे गरजेचे आहे.

**-विठ्ठल ममताबादे,** उरण

# उरण नगर परिषद करांच्या वसुलीला विलंब



**उरण : वार्ताहर**

उरण नगर परिषदेची ब्रिटिश काळात म्हणजे १८६७ मध्ये स्थापना झाली आहे. १५९ वर्षाच्या कारकिर्दीतील एकमेव उत्पन्नाचे साधन असलेला जकात सरकारने १९९९ पासून बंद केला आहे. नगर परिषदेकडे मालमत्ता पाणीपट्टी, मल निस्सारण, शिक्षण, उपकर, आणि सामान्य कर हेच नगर परिषदेचे आर्थिक उत्पन्नाचे मुख्य स्त्रोत राहिले आहे

या करातूनच नगर परिषद प्रशासकीय सेवा, रस्ते, पथदिवे, कचरा व्यवस्थापन आणि पाणीपुरवठा यासारख्या मूलभूत सुविधा पुरविते, मात्र पूर्णतः वसुली होत नसल्याने मूलभूत व पायाभूत सुविधा पुरविण्यात नगर परिषदेला अडचणी येत आहेत. अवघ्या साडेतीन चौरस किलोमीटर क्षेत्रावर वसलेल्या उरण नगर परिषदेकडे विविध कराव्यतीरिक्त आर्थिक उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. या करांचीही वसुली वेळेवर होत नसल्याने क वर्गातील उरण नगरपरिषदला सातत्याने शासनाकडून मिळणाऱ्या निधीची वाट पहावी लागते, मात्र हा निधीही वेळेवर उपलब्ध होत नसल्याने, शहरातील पायाभूत सुविधांवर परिणाम होतो. नगर परिषदेला मालमत्ता करातून ४ कोटी १८ लाख, पाणीपुरवठ्यातून दोन कोटी ६० लाख आणि मल निस्सारण, शिक्षण, उपकर असे एकत्रित सुमारे साडेसात कोटी उत्पन्न मिळते.

उरण नगर परिषदेला मिळणाऱ्या विविध करातूनच शहराच्या विकासाचा गाडा हाकावा लागतो, याशिवाय कराची रक्कम ही पूर्णपणे वसूल होत नाही. त्यामुळे शहराच्या विविध विकास कामांवर परिणाम होत असल्याचे उरण नगर परिषदेतील शहर रचनाकार निखिल ढोरे यांनी सांगितले.

नगर परिषदेची दरवर्षी मालमत्ता कराची वसुली ४.१८ कोटी पैकी २. ७५ कोटी ७५ टयापर्यंत होते. पाणीपट्टी वसुली १ कोटी ६० लाखांपैकी ४५ ते ५० टक्केच होते, मात्र पाणी बिलापोटी एम आय डी सी ला दरमहा १२ लाख तर वीज बिल १२ लाख आणि इतर विविध खर्चा पोटी असे एकूण ४५ ते ५० लाख रुपये खर्च येतो. मिळणाऱ्या आर्थिक उत्पन्नातून ९० टक्के रक्कम खर्ची पडते.

**उरण नगर परिषद कर वसुलीसाठी अभय योजना वृत्तपत्रात जाहिराती, जनजागृती असे अनेक उपक्रम राबविते. पुनर्विकासाठी निष्कासित केलेल्या इमारतींमुळे मालमत्ता कराची वसुली करता येत नाही. अनेक नळ जोडणीही बंद आहेत. त्यामुळे कर वसुली कमी होते. कामगारांच्या वेतन, पेन्शन, शासकीय इतर खर्च भागवण्यासाठी नेहमीच सरकारकडून मिळणाऱ्या विविध अनुदानाची प्रतीक्षा करावी लागते.**

**-राजेंद्र घाडगे,** ओएस, उरण नगर परिषद

# कोर्लई येथे भीषण कृत्रीम पाणीटंचाई; ग्रामस्थांचे हाल

**रेवदंडा : प्रतिनिधी**

मुरुड तालुक्यात रस्ता रूंदीकरण क्रॉकिटीकरण व नुतनीकरण कामात खोदाई काम करताना ठेकेदारांच्या निष्काळजीपणाने ठिकठिकाणी जनजीवन पाणी पुरवठा योजनेअंतर्गत असलेली पाईप लाईन फुटली त्यामुळे तालुक्यातील कोर्लई येथे भीषण कुत्रीम पाणी टंचाईने ग्रामस्थांचे हाल झाले असून कोर्लई येथील संतप्त ग्रामस्थांनी ग्रामपंचायत कार्यालयात धाव घेतली.




कोर्लई गावाला फणसाड धरणातून पाणी पुरवठा होतो, जनजीवन योजनेअंतर्गत पाणी पुरवठा फणसाड धरणातून सुरळीत सुरू होता, परंतू सध्यस्थितीत मुरूड तालुक्यातून कोर्लई येथील मुख्यः रस्तावर रेवस-रेड्डी अंतर्गत रस्त्याचे नुतनीकरण, क्रॉकिटीकरण व रूंदीकरणाचे काम सुरू आहे. तसेच मांडळा ते फणसाड धरण या मार्गात सुध्दा अनेक ठिकाणी नुतन रस्तासाठी खोदाई वगैरे कामे करण्यात आली आहेत. यामध्ये रस्ता रूंदीकरण क्रॉकिटीकरण व नुतनीकरण कामात खोदाई काम करताना ठेकेदारांच्या निष्काळजीपणाने ठिकठिकाणी जनजीवन पाणी पुरवठा योजनेअंतर्गत असलेली पाईप लाईन फुटली गेली. या फुटलेल्या पाईप लाईनची तात्पुरती दुरूस्ती केली जाते, परंतू फुटलेल्या पाईपलाईन मधून पाणी झिरपत रहाते, परिणाम कोर्लई गावापर्यंत पाण्याचा प्रेशर पाणी पुरवठा करण्यास सुयोग्य होत नसल्याने कोर्लई गावात पाणी मिळत नाही. यामुळे एकप्रकारे कृत्रीम पाणी टंचाई कोर्लई गावात निर्माण झाली आहे. दरम्यान कोर्लई ग्रामपंचायतीचे वतीने ख्रिश्चनपाडा ग्रामस्थांना टॅकरने पाणी पुरवठा कोर्लई ग्रामपंचायत मार्फत करण्यात येत असल्याचा खुलासा सरपंच राजश्री मिसाळ यांनी केला होता.

काही दिवसांपुर्वी कोर्लई ग्रामस्थांनी या कृत्रीम भीषण पाणी टंचाईबाबत सरपंच राजश्री मिसाळ यांचेशी चर्चा-संवाद केला होता. मात्र अदयापी दोन महिने पुर्ण झाले तरीही पाण्याची टंचाई दुर झाली नसल्याने कोर्लई ग्रामस्थांचे बेहाल झाले आहे. त्यामुळे दुपारी साडेबाराचे सुमारास कोर्लई ग्रामस्थ व महिला ग्रामपंचायत कार्यालयात मोठया संख्येने उपस्थित राहीले, फणसाड धरणात मुबलक पाणी पुरवठा आहे, तसेच आजूबाजूस पंचक्रोशीत पाणी पुरवठा सुरळीत सुरू असताना कोर्लई तेथे पाण्याच्या गंभीर समस्येने तणावाचे वातावरण निर्माण झाले होते, यावेळी उपस्थित ग्रामपंचायत अधिकारी आशा बिरवाडकर-काजारे यांचेशी ग्रामस्थ व महिला यांनी संवाद साधला, परंतू ग्रामपंचायत सरपंच त्याचा अधिकारात या विषयी बोलतील असा पवित्रा ग्रामपंचायत अधिकारी आशा बिरवाडकर-काजारे यांनी घेतला. त्यामुळे खुप कोर्लई सरपंच राजश्री मिसाळ कामानिमित्त बाहेर असल्याने ग्रामस्थांशी भेट होवू शकली नाही.

# ना.भरत गोगावले उत्तर कोकण विभागीय संपर्कप्रमुख

**माणगाव : प्रतिनिधी**



महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शिवसेना उत्तर कोकण विभागीय संपर्कप्रमुखपदी राज्याचे रोजगार हमी योजना व फलोत्पादन खात्याचे मंत्री भरत गोगावले यांची नियुक्ती केली आहे. ना.भरत गोगावले यांच्या या नियुक्तीने त्यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.

ना.भरत गोगावले हे रायगड जिल्ह्यातील एक मोठे नाव असून १९४ महाड विधानसभा मतदार संघातून सलग ४ वेळा ते शिवसेना पक्षातून निवडून येऊन त्यांनी विक्रम केला आहे. शिवसेना पक्षात फूट पडल्यानंतर ना.भरत गोगावले हे एकनाथ शिंदे यांच्या शिवसेना पक्षाबरोबर आले. त्यानंतर राज्यात भारतीय जनता पार्टी समवेत एकनाथ शिंदे यांच्या शिवसेना पक्षाला सत्तेत येण्याची संधी मिळाली. त्यानंतर सत्ता हे सेवेचे साधन समजून ना.भरत गोगावले यांनी आपल्या संपूर्ण महाड विधानसभा मतदार संघात विकास कामांची गंगा आणली. अनेक कोट्यवधी रुपयांची विकास कामे त्यांनी केली आहेत. या सर्व कार्य प्रणालीवर विश्वास दाखून पक्ष नेतृत्वाने शिवसेना पक्षाच्या उत्तर कोकण विभागीय (रायगड – पालघर) संपर्कप्रमुखपदी नियुक्ती केली आहे.

# रोहा भुवनेश्वर येथे नागरीकांसाठी ओपन जिम

**रोहे : प्रतिनिधी**

ग्रुप ग्रामपंचायत वरसे सदस्या अपूर्वा शिंदे यांच्या पुढाकाराने पोस्को आय एस डि सी व श्री मातेश्वरी ट्रान्सपोर्ट यांच्या माध्यमातून एकता नगर मधील नागरिकांसाठी सामाजिक उत्तरदायित्व अंतर्गत मैदानी व्यायामशाळेच्या साहित्याचे मंगळवारी सायंकाळी राजिप उपाध्यक्ष मधुकर पाटील व पोस्को आय एस डि सी चे डायरेक्टर डोंगव्हु कॉन यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले.

यावेळी सरपंच रामा म्हात्रे, पोस्को आय एस डि सी सिनियर मॅनेजर सुधीर भोसले, पोस्को आय एस डि सी डेप्युटी जनरल मॅनेजर अजय मसेवाल, अमित मोहीते, मनोहर सकपाळ, शांतीशील तांबे, गणेश शिवलकर, राकेश गुरव, नंदकुमार शिंदे, सुहास खरीवले, अपुर्वा शिंदे, अशोक निकम, नागेश शिंदे, समीर देवरे, निनाद शिंदे आदी उपस्थित होते.

यावेळी मधुकर पाटील यांनी अपुर्वा शिंदे यांची संकल्पनामुळे ओपन जिम भुवनेश्वर गावाच्या मध्यवर्ती ठिकाणी होत आहे.नागरीकांनी याचा उपयोग करा असे आवाहन करीत महीलांसाठी प्रत्येक विभागात योग क्लासेस सुरू करणार असल्याचे सांगितले.

. डोंगव्हु कॉन यांनी ग्रामस्थांनी माझे आदर सत्कार केल्याने मी भारावुन गेलो आहे.या जिमचा नागरीकांनी पुरेपुर वापर करुन आपले आरोग्य चांगले ठेवावे असे सांगत भविष्यात ही आमचे सहकार्य राहाणार असल्याचे सांगितले.

प्रास्ताविकातअपुर्वा शिंदे यांनी पोस्को आय एस डि सी व श्री मातेश्वरी ट्रान्सपोर्ट यांच्या सहकार्याने सामाजिक दायित्वातुन ओपन जिम एकता नगर येथे होत असल्याने त्यांचे मी आभार मानते.असेच सहकार्य भविष्यात राहावे अशी विनंती केलीयावेळी मनोगत सुहास खरीवले यांनी केले तर सुत्रसंचलन व आभार निनाद शिंदे यांनी मानले.



# मुरुडच्या कनिष्ठ अभियंता श्रद्धा बोऱ्हाडेंना पोलीस कस्टडी

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरुड सार्वजनिक बांधकाम खात्यामध्ये कनिष्ठ अभियंता या पदावर काम करणाऱ्या श्रद्धा दिलीप बोऱ्हाडे यांना दोन लाख पन्नास हजार रुपयाची लाच स्वीकारताना लाचलुचपत विभागाने रंगेहात पकडले होते. न्यायालयात हजर केले असता त्यांना तीन दिवसांची पोलिस कस्टडी देण्यात आली आहे.एका ठेकेदाराने मुरुड शहरा जवळ असणाऱ्या एकदर,राजपुरी, खोकरी येथील गावातील रस्त्यालगत स्लॅब ड्रेनचे काम पूर्ण केले होते. सदरचे काम पूर्ण झाल्यावर झालेल्या कामाचे पूर्ण बिल अंदाजपत्रक सह तयार करून देण्याकरिता कनिष्ठ अभियंता श्रद्धा बोऱ्हाडे यांनी तक्रारदार यांच्याकडून कार्यालयात दोन लाख पन्नास हजार रुपयांची लाच मागीतली होती.

# पोस्कोच्या पुढाकारातून महिलांच्या उद्योजकतेला नवे बळ

**माणगाव : बातमीदार**

औद्योगिक प्रगतीसोबतच सामाजिक बांधिलकी जपत POSCO Maharash-tra Steel यांच्या महिला सक्षमीकरण उपक्रमांतर्गत माणगाव विभागातील स्थानिक महिला उद्योजक व शेतकरी उत्पादकांसाठी कुणबी भवन हॉल येथे प्रदर्शनाचे यशस्वी आयोजन करण्यात आले.

या प्रदर्शनामध्ये एकूण ३५ स्टॉल्स उभारण्यात आले होते. या स्टॉल्समध्ये



घरगुती खाद्यपदार्थ, हस्तकला वस्तू, कृषी उत्पादने, प्रक्रिया केलेले अन्नपदार्थ तसेच विविध स्थानिक उत्पादनांचे आकर्षक सादरीकरण करण्यात आले. सुमारे ८० हून अधिक सहभागींचा या उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग लाभला.

कार्यक्रमाला जी युन पार्क सर, महेंद्र तट्टे सर, विशाल शेंडे सर तसेच सीएसआर टीम यांची उपस्थिती लाभली. उपस्थित मान्यवरांनी महिलांनी तयार केलेल्या उत्पादनांचे कौतुक करत त्यांच्या उद्योजकतेला प्रोत्साहन दिले.

या प्रदर्शनामुळे ग्रामीण भागातील महिलांना त्यांच्या कौशल्यांना बाजारपेठ उपलब्ध झाली असून स्वावलंबनाकडे वाटचाल करण्यासाठी एक प्रभावी व्यासपीठ मिळाले आहे. तसेच उत्पादनांमध्ये विविधता, गुणवत्ता सुधारणा आणि विपणन कौशल्य वाढविण्याच्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरला.

सदर प्रदर्शन केवळ विक्रीपुरते मर्यादित न राहता महिलांमध्ये आत्मविश्वास निर्माण करणारे आणि उद्योजकतेची नवी दिशा देणारे ठरले. सहभागी महिला व स्थानिक नागरिकांकडून या उपक्रमास मोठा प्रतिसाद मिळाला. असे उपक्रम महिला सक्षमीकरणासाठी मोलाचे योगदान देणारे आहेत .

# वढाव येथील बहिरीदेव यात्रा उत्साहात

**पेण : प्रतिनिधी**

पेण तालुक्यातील वढाव येथील बहिरीदेवाचा यात्रोत्सव उत्साहात पार पडला. यात्रेत परंपरागत चालत आलेल्या पालखी सोहळयात येथील भाविक उघड्या अंगावर काटेरी पेरकूट मारुन घेवून आपला आनंद व्यक्त केला. याच काटेरी पेरकुटांनी उपस्थित हजारो भाविकांचे लक्ष केंद्रीत करुन यात्रेला रंगत आणली. बहिरीदेवाचा लेपा दुपारी वढाव गावातून वाजतगाजत मोठे वढाव येथे नेण्यात आला. तेथून दिव येथील नागेश्वर देवाचा छबिना हे दोन्ही देवस्थान मोठे वढाव येथील आपल्या बहिणीची भेट घेवून दोन्ही व्यामदैवत परत माघारी फिरविण्यात आले. वळाव येथील राधाकृष्ण मंदिराच्या



पटांगणात बहिरीदेवाचा छबिना उतरल्यानंतर ग्रामस्थांनी सजविलेल्या देवकाठ्या मोठ्या दिमाखात उभारल्या.

यावेळी व्यामस्थांचा उत्साह वेगळाच पहायला मिळाला. ढोलताशाच्या गजरात व अंगावर पेरकुटे मारुन भक्तगण बेदुध होतून नाचत होते. गावातील लहानांपासून तरुणवर्ग काटेरी पेरकूट मारुन घेण्यास आघाडीवर असतात. यात्रेनिमित्त देवकाठ्यांची स्पर्धा मोठ्या उत्साहात पार पडली. या यात्रेत हजारो नागरीक सहभागी होवुन यात्रेचा आनंद घेतला.

यात्रेत अनेक छोटोमोठी कटलरीची तसेच मेवा-मिठाईची दुकाने मांडण्यात आली होती यानिमित्त लाखोरुपयांची उलाढाल झाली.

# रायगड जिल्हा कनिष्ठ महाविद्यालय शिक्षक संघटनेची वार्षिक सभा उत्साहात

**माणगाव : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा कनिष्ठ महाविद्यालय शिक्षक संघटनेची वार्षिक सर्वसाधारण सभा माणगाव येथील शैक्षणिक संकुलनात मंगळवार दि.३१ मार्च २०२६ रोजी उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली.

या सभेत अध्यक्षपदाच्या निवडणुकीत प्रा. भानुदास एन. बिरादार यांनी प्रभावी विजय मिळवत पुन्हा एकदा अध्यक्षपदावर विराजमान झाले. त्यांनी एकूण १०८ मते मिळवून प्रतिस्पर्धी उमेदवाराचा तब्बल ५७ मतांनी पराभव केला. व सलग दुसऱ्यांदा रायगड जिल्हा कनिष्ठ महाविद्यालय शिक्षक संघटनेचे अध्यक्षपदी विराजमान होण्याचा मान त्यांना मिळाला. अशोक दादा साबळे विद्यालयाच्या सभागृहामध्ये ही निवड प्रक्रिया संपन्न झाली सर्वांच्या सुख-दुःखामध्ये मदत करण्यासाठी ते नेहमीच अग्रेसर असतात शिक्षकांच्या समस्या सोडवण्यासाठी त्यांचे भूमिका अग्रगण्य अशीच होती ,याची प्रचिती सलग तीन वर्ष सर्व शिक्षकांना आलेली आहे .याचीच परिणीती म्हणून त्यांना या निवडणुकीमध्ये



भरघोस मते मिळाली आणि ते अध्यक्षपदी विराजमान झाले. त्यांच्या या निवडीबद्दल संस्थेचे अध्यक्ष ज्येष्ठ विधीज्ञ अँड.राजीव साबळे,सचिव कृष्णाभाई गांधी,स्कूल कमिटीचे चेअरमन नरेंद्र गायकवाड,संचालक नितीन बामगुडे,डॉ.आबासाहेब पाटणकर , अँड.विनोद घायाळ आदी सर्व संचालकांच्या व शिक्षक सर्व शिक्षक -शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वतीने त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करण्यात आले. निवडणुकीत विजयी झाल्यानंतर प्रा. बिरादार यांचे उपस्थित शिक्षकांनी जोरदार टाळ्यांच्या गजरात अभिनंदन केले. त्यांच्या नेतृत्वाखाली संघटनेचे कार्य अधिक बळकट होईल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. करण्यात आले

# कर्जत तालुक्यात डिजिटल शेती शाळा उपक्रम सुरू

**कर्जतः प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यात आधुनिक शेतीचा मंत्र देण्यासाठी कृषी विभाग सरसावला आहे. त्यामुळे तालुक्यात आता अधुनिक शेतीचा मंत्र घुमणार आहे. नानाजी देशमुख प्रकल्प आणि पाणी फाउंडेशनतर्फे 'डिजिटल शेती शाळा' उपक्रम सुरू झाला आहे. ऑनलाईन पद्धतीने शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यास सुरुवात झाली असून शेतकऱ्यांनी या सत्राला मोठा प्रतिसाद दिला आहे.




हवामानातील अनिश्चितता, वाढता उत्पादन खर्च आणि नवनवीन रोगांचा प्रादुर्भाव यांमुळे सध्या शेती व्यवसाय आव्हानात्मक बनला आहे. या आव्हानांवर मात करून शेती अधिक शाश्वत आणि फायदेशीर करण्यासाठी नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प आणि पाणी फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने कर्जत तालुक्यात 'डिजिटल शेती शाळा' हा नाविन्यपूर्ण उपक्रम राबवण्यास सुरुवात झाली आहे. 'बदलूया रीत शेतीची,वाढवूया रास समृद्धीची' या ब्रीदवाक्यासह सुरू होणाऱ्या या मोहिमेत कर्जत तालुक्यातील सर्व शेतकरी या ऑनलाइन शाळेत सहभाग घेताना दिसत आहेत. बदलत्या हवामानानुसार तंत्रज्ञानाची सांगड कर्जत तालुका हा भात शेतीसाठी प्रसिद्ध आहे.

गेल्या काही वर्षांत पावसाचे बदललेले स्वरूप आणि वाढत्या उष्णतेमुळे पिकांच्या उत्पादकतेवर परिणाम होत आहे. यावर उपाय म्हणून हवामान अनुकूल तंत्रज्ञान (Climate Re-silient Technology - CRT) ही संकल्पना या शेती शाळेच्या केंद्रस्थानी आहे. ही शाळा पूर्णपणे 'डिजिटल' असून शेतकरी आपल्या स्वतःच्या गावातून, आपल्याच मोबाईलवरून तज्ज्ञांशी संवाद साधून मार्ग काढण्याचा प्रयत्न करीत आहेत. शेती शाळेचे नियोजन.. डिजिटल शेती शाळा एप्रिल महिन्यात चार महत्त्वाच्या टप्प्यांत विभागली गेली आहे. प्रत्येक सत्रात शेतकऱ्यांच्या दृष्टीने महत्त्वाच्या विषयांवर सखोल मार्गदर्शन केले जाणार आहे. त्यात पेरणीपूर्व नियोजन मध्ये खरीप हंगामाच्या सुरुवातीला करण्यात येणारी तयारी म्हणजे निम्मी शेती जिंकण्यासारखे आहे. बियाण्यांची निवड, जमिनीची मशागत आणि हवामानाचा अंदाज घेऊन पेरणीचे नियोजन कसे करावे. याचे तांत्रिक मार्गदर्शन करण्यात आले. शेतीचा खर्च वाढण्यामागे रासायनिक खते आणि महागडी औषधे हे मुख्य कारण आहे.

# शिवसेना रायगड लोकसभा संपर्कप्रमुखपदी अनिल नवगणे

**माणगावः प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व राज्याचे रोजगार हमी योजना मंत्री.भरत गोगावले यांच्या आदेशाने तसेच माजी मंत्री व शिवसेना नेते रामदास कदम यांच्या सूचनेनुसार शिवसेना पक्षाच्या ३२ रायगड – रत्नागिरी लोकसभा मतदार संघाच्या संपर्कप्रमुखपदी माणगाव तालुक्यातील इंदापूर गावचे माजी जिल्हाप्रमुख अनिल दत्ताराम नवगणे यांची नियुक्ती पक्ष नेतृत्वाने केली आहे. अनिल नवगणे यांच्या या निवडीबद्दल त्यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.



अनिल नवगणे हे गेली अनेक वर्षांपासून राजकीय व सामाजिक क्षेत्रात काम करीत आहेत. ते कुणबी समाजाचे नेते म्हणून मुंबईसह संपूर्ण कोकणात ओळखले जातात. सध्या ते कुणबी समाजोन्नती संघ महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष म्हणून काम पाहत आहेत.हे. राजकारणाच्या माध्यमातून समाजकारण हे ध्येय नजरेसमोर ठेऊन ते गेली अनेकवर्ष अगदी कॉलेज जीवनापासून बहुजन समाजात सामाजिक बांधिलकी व जातीय सलोखा ठेऊन काम करीत आहेत. त्यांच्या पत्नी स्वाती नवगणे या जिल्हा परिषद सदस्या असताना तसेच इंदापूर ग्रामपंचायतमार्फत विविध विकासाची कामे करण्याचा त्यांनी प्रामाणिक प्रयत्न केला.

प्रसंगी आंदोलने, मोर्चे काढून शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला आहे. रायगड जिल्ह्यातील एक डॅशिंग नेतृत्व म्हणून नवगणे यांच्याकडे पहिले जात असून विविध राजकीय व्यासपीठावरून बहारदार वक्तृत्व करून रायगड जिल्ह्यातील मुलुख मैदान तोफ म्हणून त्यांनी ख्याती मिळविली आहे.

राजकारण व समाजकरण करीत असताना जेष्ठांबरोबरच तरुणांना संघटित करून ते आपले कार्य पुढे नेण्याचा सातत्याने प्रयत्न करीत असतात. .

# श्री कोटेश्वरी देवस्थान ट्रस्टतर्फे ग्रामदैवत श्री कोटेश्वरी देवीची पालखी

**मुरुड : प्रतिनिधी**

श्री कोटेश्वरी देवस्थान ट्रस्ट ,सर्व विश्वस्त,समाज बांधव,पाखाडी अध्यक्ष व गावातील भाविकांच्या विचारविनिमयाने आज २३ वा वर्ष पालखी सोहळाचे आयोजन करण्यात आले होते. या पालखी सोहळ्याचे मान मुरूड कराडी समाज गावदेवी पाखाडी यांना मिळाला.पालखीत देवीचा चांदीचा मुखवटा ठेवून कराडी समाज अध्यक्ष परशुराम शामा व पालखी उत्सव समिती सदस्य अध्यक्ष नयन कर्णिक यांनी पालखी उचलुन पालखीला सुरुवात करण्यात आली. श्री कोटेश्वरी माते की जय ,आंबे माते की जय,जय भवानी जय शिवाजी,हर हर महादेव च्या घोषण देत परिसर दणाणून गेला.यावेळी शहरातील भजन मंडळी यांनी पालखीत टाळ मृदुंग वाजवत भजन किर्तन गायन करत श्री कोटेश्वरी मातेचा जयजयकार करत होते .पालखी तहसीलदार कार्यालय, दरबार रोड,मारुती नाका, गणेश आळी नाका,भोगेश्वर मंदिर मार्ग समाज आळी पर्यंत , लक्ष्मीनारायण मंदिर,भोगेश्वर मार्ग काढण्यात आली यावेळी



पालखी चे स्वागत करण्यासाठी घरोघरी व परिसरात व रस्तावर सुंदर रांगोळ्या महिलांवर्गा कडुन काढण्यात आल्या होत्या.तसेच भाविकांना थंड पेय, चहा पाण्याची सोय करण्यात आली होती.

पालखीत महिलांसह शेकडो भाविक सहभागी झाले होते.पालखीचे दर्शन व देवीची ओटी भरण्यासाठी सुवासिनी यावेळी गर्दी केली होती.यावेळी प्रत्येक भाविकांना पुजारी मंगेश पाटील यांच्या कडुन प्रसाद वाटप करण्यात येत होते..ही पालखी पुन्हा श्री कोटेश्वरी मंदिरात आल्यावर देवीची खणा-नारळानी ओटी भरून तिचे स्वागत केले जाते.

पुन्हा पालखी मंदिरात आणून देवीची आरती केली जाते. दुसऱ्यादिवशी सकाळपासून यात्रेला सुरुवात होते. यावेळी पोलीस निरीक्षक परशुराम कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली चोख पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. या वेळी दरबार रोडवर स्वतः हा पोलिस निरीक्षक परशुराम कांबळे, सहाय्यक पोलीस निरीक्षक राजेश , पोलिस उपनिरीक्षक अर्चना मोगरे व पोलिस मकरंद पाटील नाईक किशोर बठारे आदिंसह पोलिसांनी पालखी उचलुन श्री कोटेश्वरी देवीची पुजा करण्यात आली.

# पंजाब किंग्सचा गुजरातवर विजय



**पंजाब : वृत्तसंस्था**

आयपीएल २०२६ स्पर्धेत पंजाब किंग्स आणि गुजरात टायटन्स हे संघ आमनेसामने आले होते. या सामन्यात पंजाब किंग्सने बाजी मारली. खरं तर गुजरात टायटन्सने अत्यंत सुमार दर्जाची फलंदाजी केली असं म्हणायला हरकत नाही.

आयपीएल २०२६ स्पर्धेतील चौथ्या सामन्यात पंजाब किंग्स आणि गुजरात टायटन्स हे संघ आमनेसामने आले होते. या सामन्यावर पूर्णपणे पंजाब किंग्सचा वरचष्मा दिसला. पंजाब किंग्सने नाणेफेकीचा कौल जिंकला आणि प्रथम गोलंदाजी स्वीकारली. खरं तर हा हायस्कोरिंग सामना होईल असं वाटलं होतं. पण गुजरातची फलंदाजी हवी तशी झाली. एकही फलंदाजी आक्रमक फटकेबाजी करू शकला नाही. कारण खेळपट्टी धीमी होती आणि चेंडू थांबून बॅटवर येत होता. त्यात मैदान मोठं असल्याने फटका मारला तर झेल बाद होत होते. त्यामुळे मोठी धावसंख्या उभारण्यात अपयश आलं. गुजरात टायटन्सने २० षटकात ६ गडी गमवून १६२ धावा केल्या. तसेच विजयासाठी १६३ धावांचं आव्हान दिलं.

हे आव्हान पंजाब किंग्सने सहज गाठेल असं सुरूवातीला वाटलं होतं, पण तसं झालं नाही. पंजाब किंग्सला या विजयासाठी चांगलंच झुंजावं लागलं. हे आव्हान गाठताना पंजाब किंग्सने ७ विकेट गमावले आणि शेवटच्या षटकात विजय मिळवला.

गुजरात टायटन्सकडून एकही फलंदाजी मोठी खेळी करू शकला नाही. साई सुदर्शन १३ धावांवर बाद झाला. त्यानंतर कर्णधार शुबमन गिल आणि जोस बटलर यांनी सावध खेळी केली. पण त्यांचा स्ट्राईक रेट काही खास राहिला नाही. शुबमन गिलने २७ चेंडूत ३८, तर जोस बटलरने ३३ चेंडूत ३८ धावा केल्या. ग्लेन फिलिप्स १७ चेंडूत २५ धावा करून बाद झाला. शाहरूख खान ४ धावा करू शकला. राहुल तेवतियाने नाबाद ११ धावांवर राहिला. पंजाबकडून विजयकुमार विशाकने ३, युजवेंद्र चहलने २, तर मार्को यानसेनने १ विकेट काढली.

विजयी धावांचा पाठलाग करताना पंजाब किंग्सची सुरूवात काही चांगली झाली नाही.अवघ्या ७ धावांवर प्रियांश आर्याच्या रूपाने पहिला धक्का बसला. त्यानंतर प्रभसिमरन सिंग आणि कूपर कॉनोली यांनी डाव सावरला. दुसरी विकेट ८३ धावांवर प्रभसिमरन सिंगची पडली. त्यानंतर श्रेयस अय्यर संघाच्या ११० धावा असताना बाद झाला. या नंतर सामन्याचं चित्र पालटलं. नेहल वढेरा, शशांक सिंग, मार्कस स्टोयनिस आणि मार्को यानसेन यांच्या धडाधड विकेट पडल्या. त्यामुळे गुजरात टायटन्सकडे सामना झुकला, पण कूपर कोनोलीने नाबाद ७२ धावांची खेळी करत संघाला विजयाच्या वेशीवर पोहोचवलं.

पंजाब किंग्सने यासह स्पर्धेतील पहिल्या विजयाची नोंद केली. गेल्या हंगामात पंजाब किंग्सने अंतिम फेरी गाठली होती. पण आरसीबीकडून पराभव झाल्याने पहिल्या जेतेपदाबाबत स्वप्नभंग झाला होता. आता पुन्हा नव्या उमेदीने संघ मैदानात उतरला आहे.

# 'महाराष्ट्र केसरी'मध्ये रायगडच्या पैलवानांची उल्लेखनीय कामगिरी

## ■ क्रीडाप्रेमी नगरसेवक परेश ठाकूर यांच्याकडून कौतुक



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सोलापूर येथे २८ ते २९ मार्च दरम्यान पार पडलेल्या महिला महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेत रायगड जिल्ह्याच्या महिला पैलवानांनी उल्लेखनीय कामगिरी करत जिल्ह्याच्या नावलौकिकात भर घातली. या स्पर्धेत रायगड जिल्हा कुस्ती असोसिएशनच्या खेळाडूंनी दमदार प्रदर्शन करत पदकांची कमाई केली.

५९ किलो वजनी गटात लोकनेते श्री रामशेठ ठाकूर राष्ट्रीय कुस्ती संकुलाची राष्ट्रीय महिला पैलवान अमेघा घरत हिने उत्कृष्ट झुंज देत रौप्य पदक पटकावले. तर खोपोली येथील प्रांजल कुंभार हिने ६५ किलो वजनी गटात कांस्य पदक मिळवत रायगडसाठी आणखी एक यश नोंदवले. या यशस्वी कामगिरीबद्दल रायगड जिल्हा कुस्ती असोसिएशनचे अध्यक्ष तथा नगरसेवक परेश ठाकूर यांनी दोन्ही खेळाडूंचे अभिनंदन केले.

यावेळी भाजप युवा नेते मयुरेश नेतकर, स्पर्धेसाठी मार्गदर्शन करणारे राष्ट्रीय पैलवान कोच रुपेश पावसे तसेच असोसिएशनचे सहसचिव निलेश म्हात्रे उपस्थित होते. रायगडच्या महिला पैलवानांनी मिळवलेल्या या यशामुळे जिल्ह्यात आनंदाचे वातावरण असून, भविष्यातही अशाच उल्लेखनीय कामगिरीची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# जय बजरंग रोहा कबड्डी संघाच्या राज मोरेची दमदार झेप

## राज्य निवड चाचणीसाठी सलग दुसऱ्यांदा रायगड जिल्हा संघात निवड

**धाटाव : प्रतिनिधी**



जय बजरंग रोहा कबड्डी संघाचा अष्टपैलू खेळाडू राज ज्ञानेश्वर मोरे याने आपल्या उत्कृष्ट खेळाच्या जोरावर पुन्हा एकदा राज्य पातळीवर झेप घेतली आहे. त्याची सलग दुसऱ्यांदा महाराष्ट्र राज्य निवड चाचणीसाठी रायगड संघात निवड झाली आहे. राज मोरे याची क्रीडा वाटचाल सातत्यपूर्ण यशाने भरलेली आहे. सन २०२० मध्ये किशोर गटात त्याने जय बजरंग रोहा संघाला रायगड जिल्हा निवड चाचणी स्पर्धेत अंतिम विजेता बनवण्यात मोलाची भूमिका बजावली. त्यानंतर कुमार गटात कर्णधार म्हणून दोन वेळा संघाला विजेतेपद मिळवून दिले, ज्यामुळे त्याचे नेतृत्वगुण अधोरेखित झाले.

त्याच्या या उत्कृष्ट कामगिरीची दखल घेत २०२५ मध्ये रायगड जिल्हा कुमार गट संघाचा कर्णधार म्हणून निवड करण्यात आली. पुढे त्याने महाराष्ट्र कुमार गट संघात स्थान मिळवत राज्य पातळीवर आपली छाप पाडली नुकत्याच पार पडलेल्या रायगड जिल्हा निवड चाचणी कबड्डी स्पर्धेत त्याने पुन्हा एकदा प्रभावी खेळ सादर केला. या कामगिरीच्या जोरावर त्याची प्रथम ४० खेळाडूंमध्ये निवड झाली आणि त्यानंतर अंतिम २२ खेळाडूंमध्ये स्थान मिळवत जिल्हा सराव शिबिरासाठी निवड झाली.यानंतर आता नाशिक येथे दि. २ एप्रिल ते ६ एप्रिल २०२६ या कालावधीत होणाऱ्या ७३ व्या वरिष्ठ गट पुरुष कबड्डी महाराष्ट्र राज्य अजिंक्यपद निवड चाचणी स्पर्धेसाठी रायगड जिल्हा संघात त्याची निवड झाली आहे.

राज मोरे याची ही यशस्वी वाटचाल म्हणजे मेहनत, शिस्त आणि जिद्दीचे उत्तम उदाहरण असून जय बजरंग रोहा संघ व रोहा तालुक्याचा अभिमान अधिक उंचावला आहे.त्याच्या या यशाबद्दल सर्व स्तरांतून अभिनंदन होत असून आगामी राज्यस्तरीय स्पर्धेसाठी त्याला हार्दिक शुभेच्छा!

# बॉल टेम्परिंग प्रकरणात फखर झमानवर बंदी

**कराची : वृत्तसंस्था**

पाकच्या खेळाडूने जे कृत्य केले ते पंचांनी पकडले. एवढेच नाही तर मैदानातील त्याचा कारनामा कॅमेऱ्यात कैद झाला अन् याच पुराव्याच्या आधारावर त्याला दोषी ठरवण्यात आले. या प्रकरणात त्याच्यावर पाकिस्तान सुपर लीगमधील दोन सामन्यांवर बंदीची कारवाई करण्यात आली आहे. पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने निवेदन जारी करत ही माहिती दिली.

हा प्रकार सामन्याच्या दुसऱ्या डावात १९ व्या षटकाच्या अखेरीस घडला. शेवटच्या षटकात कराची फ्रँचायझी संघाला विजयासाठी १४ धावांची गरज होती. त्यावेळी फखर झमान लाहोर संघातील आपला सहकारी हॅरिस रौफ आणि कर्णधार शाहीन शाह आफ्रिदी यांच्यासोबत चर्चा करताना दिसून आले. चर्चेच्या बहाण्याने त्याने चेंडूशी छेडखानी केली. मैदानातील पंच फैसल आफ्रिदी यांना संशय आल्याने त्यांनी चेडू मागून तो तपासल्यावर प्रकार उघड झाला.

पीसीबीने आपल्या निवेदनात म्हटले आहे की, फखर झमान याच्यावर पीएसएलमधील दोन सामन्यांसाठी बंदी घालण्यात आली आहे. लाहोर कलंदर्स आणि कराची किंग्स यांच्यातील सामन्यात त्याने कलम २.१४चे उल्लंघन केले आहे.

# सानिया मिर्झाचा खासगी आयुष्याबद्दल मोठा खुलासा

**दुबई : वृत्तसंस्था**



भारताची टेनिस स्टार सानिया मिर्झा कायमच चर्चेत असलेले नाव आहे. सानिया गेल्या काही वर्षांपासून दुबईत राहते. पाकिस्तानी क्रिकेटर शोएब मलिक याच्यासोबत लग्न केल्यानंतर दोघांनीही दुबईला राहण्याचा निर्णय घेतला. सानिया मिर्झा आणि शोएब मलिक या दोघांचे रस्ते वेगळे झाले, ही वस्तुस्थिती असली तरीही शोएबची साथ सोडल्यानंतरही सानियाने दुबई सोडली नाही.

गेल्या काही दिवसांपासून आखाती देशांवर मोठे हल्ले होत आहेत. इराण आणि अमेरिका युद्धाचा थेट मोठा फटका दुबईलाही बसला आहे. या युद्धादरम्यान सानिया मिर्झा आपले आलिशान घर सोडून भारतात काही दिवस होती. शोएब मलिक याच्यासोबतच्या घटस्फोटानंतर सानियाने आलिशान घर दुबईत घेतले. या घरात तिचा मुलगा आणि ती राहते. सानिया मिर्झा हिने बारीक बारीक गोष्टी लक्षात घेऊन घर तयार केले.

पॉम जुमेराहमध्ये सानियाचे घर आहे. सानियाने आपल्या घराबद्दल बोलताना म्हटले की, माझे घर माझ्यासाठी सर्वात सुरक्षित जागा आहे. तिथे एक वेगळेच सुख मिळते. युट्यूब चॅनल लवइन दुबईमध्ये सानिया मिर्झा आपल्या आलिशान घराची झलक दाखवताना दिसत आहे. यादरम्यान सर्वात अगोदर ग्रीक स्टाइलमध्ये बनलेले मोठे पिलर सानियाच्या घरात दिसतात.

हेच नाही तर यादरम्यान सानिया मिर्झा हिने तिच्या बेडरूमचीही खास झलक दाखवली. सानिया मिर्झा हिचे हे घर अत्यंत आलिशान आहे.

# सध्या निवृत्तीचा विचार नाही -मोहम्मद शमी

**नवी दिल्ली** : भारतीय क्रिकेट संघातून बाहेर असलेल्या अनुभवी वेगवान गोलंदाज मोहम्मद शमीने अखेर आपल्या भविष्याबद्दल आणि निवृत्तीबद्दल मोठे वक्तव्य केले आहे. देशांतर्गत क्रिकेटमध्ये प्रभावी कामगिरी करूनही भारतीय संघात स्थान न मिळाल्याने शमी चर्चेत होता, पण त्याने आता हे स्पष्ट केले आहे की, नजीकच्या काळात निवृत्त होण्याचा त्याने विचार केलेला नाही.


शमीने निवृत्तीबद्दल आपले विचार मांडले. ज्या दिवशी मला उठल्यावर कंटाळा आल्यासारखे वाटेल, त्या दिवशी मी क्रिकेट सोडेन. त्यामुळे हो, ज्या दिवशी आळस येईल किंवा कंटाळा येईल, त्या दिवशी मी थांबेन, पण सध्या ना मला कंटाळा आला आहे, ना आळस. मी खेळाचा आनंद घेतोय.






वर्ष २१ वे


ज्ञानराज माझी योग्यांची माऊली।। जेणे निगमवल्ली प्रगट केली।।


विठ्ठल रुख्मीणी तुम्ही अखंड आणा ध्यानी।।


सर्व मंगल मांगल्ये। शिवेसर्वार्थ साधिके शरण्ये त्र्यंबकेगौरी। नारायणी नमोस्तुते।।


तुकाराम तुकाराम नाम घेता कापे यम।।

**श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पुरस्कृत**
**माऊली हरिपाठ मंडळ, गव्हाण-कोपर आयोजित**

वै. ह.भ.प. अप्पा माऊली (पनवेल) यांच्या कृपाशिर्वादाने
ह.भ.प. बानुबाई (खारकोपर) यांच्या उपस्थितीत.





**अखंड हरिनाम सप्ताह**

**ग्रंथराज श्री ज्ञानेश्वरी सामुदायिक पारायण सोहळा**

व्यासपीठ चालक – ह.भ.प. शिवाजी महाराज पाटणकर (आळंदी–देवाची)

प्रारंभ: चैत्र शुद्ध १३, मंगळवार, दि. ३१/३/२०२६

देवीचा अभिषेक सकाळी ८.०० वाजता

सांगता: चैत्र कृ. ५, मंगळवार, दि. ७/४/२०२६

सर्व भाविकांना कळविण्यात आनंद होत आहे की, सालाबादप्रमाणे माऊली हरिपाठ मंडळ, गव्हाण तर्फे स्वा. सु.ह.भ.प. वै. सदानंद गुरुजी (देवाची आळंदी) यांचे परमशिष्य ह.भ.प. शिवाजी महाराज पाटणकर (देवाची आळंदी) यांच्या प्रेरणेने ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा चैत्र शुद्ध १३, मंगळवार दि. ३१/०३/२०२६ ते चैत्र कृ. ५ मंगळवार दि. ७/०४/२०२६ रोजी संपन्न होत आहे. तरी कृपया सर्व भाविकांनी ह्या पर्वणीचा लाभ घ्यावा, ही नम्र विनंती.

**दैनंदिन कार्यक्रम**

पहाटे ४.०० ते ६.०० वा. - काकडा
सकाळी ८.०० ते १२.३० वा. - ज्ञानेश्वरी पारायण
सायं. ४.०० ते ५.०० वा. - प्रवचन
सायं. ६.०० ते ७.०० वा. - सामुदायिक हरिपाठ
रात्री ०७.३० ते ०९.३० वा. - कीर्तन

**गुरुवार, दि. ०२/०४/२०२६**
प्रवचन - ह.भ.प. मनीज महाराज (बेलपाडा)
हरिपाठ - भैरवनाथ हरिपाठ मंडळ, धुतूम
किर्तनकार - ह.भ.प. डॉ. मारुती महाराज कोलाटकर (देवकान्हे-रोहा)
सौजन्य -सौ. श्रध्दा रमेश ठाकूर (खारकोपर)

**शुक्रवार, दि. ०३/०४/२०२६**
प्रवचन - ह.भ.प. राजेंद्र गुरुजी (कुंडेगाव)
हरिपाठ - शिवशंभी हरिपाठ मंडळ, कुंडेगाव
किर्तनकार - ह.भ.प. विक्रम महाराज थोरवे (गणेगाव- कर्जत)
स्मरणार्थ - कै. शिवाजी गजानन पाटील
सौजन्य - सौ. ललिता सुनिल पाटील (खारकोपर)

**शनिवार, दि. ०४/०४/२०२६**
प्रवचन - ह.भ.प.अशोक महाराज (बामणडोंगरी)
हरिपाठ- जय हनुमान प्रासादिक हरिपाठ मंडळ, बामणडोंगरी
किर्तनकार - ह.भ.प. विक्रांत महाराज पोंडेकर (आळंदी-देवाची)
स्मरणार्थ - कै. गिताबाई त्रिंबक देशमुख
सौजन्य - श्री. विराज जयवंत देशमुख (गव्हाण)

**रविवार, दि. ०५/०४/२०२६**
प्रवचन - ह.भ.प. रोशन महाराज ठाकूर (बेलपाडा)
हरिपाठ - श्री कृष्ण हरिपाठ मंडळ, बेलपाडा
किर्तनकार - ह.भ.प. भगिरथ महाराज काळे (सिन्नर)
स्मरणार्थ - कै. शिवाजी रघुनाथ देशमुख
सौजन्य - श्री. किरण शिवाजी देशमुख (गव्हाण)

**सोमवार, दि. ०६/४/२०२६**
सकाळी ८.३० वा - ग्रंथराज ज्ञानेश्वरी पुजन
सायं ४ ते ५ वा - दिंडी सोहळा व दिपोत्सव सोहळा
सामुदायीक हरिपाठ
किर्तनकार - ह.भ.प. डॉ. चारुदत्त महाराज आफळे (पुणे)
स्मरणार्थ - कै. यमुना वसंतशेठ पाटील
सौजन्य - ह.भ.प. वसंतशेठ हरि पाटील (खारकोपर)

**काल्याचे कीर्तन:** मंगळवार, दि. ०७/०४/२०२६ रोजी सकाळी १० ते १२ वा. ह.भ.प. श्रावण महाराज अहिरे (नाशिक),
सौजन्य : श्री. महेंद्रशेठ तुकाराम घरत
किर्तनसाथ : पनवेल-उरण वारकरी सांप्रदाय

**ठिकाण - श्री शांतादेवी मंदीर, गव्हाण, ता. पनवेल, जि. रायगड**


दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे–बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०–२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२–२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com